प्रकरण २ रे

# सानिया यांच्या 'खिडक्या' कथासंग्रहाचा परिचय व विशेष

पृष्ठ क्र. १३ ते ६९

# प्रकरण २ रे

# सानिया यांच्या 'खिडक्या' कथासंग्रहाचा परिचय व विशेष

**प्रस्तावना :-**

सानिया यांनी स्त्रीवादी साहित्यावर कथालेखन केले असून त्यांच्या 'खिडक्या'ह्या कथासंग्रहाची पहिली आवृत्ती १९८९ मध्ये प्रसिद्ध झाली. यामध्ये एकूण १४ कथा आहेत. तर सुधारीत दुसरी आवृत्ती ऑगस्ट २००४ मध्ये प्रसिद्ध झाली. यामध्ये काही तांत्रिक कारणास्तव 'स्वाध्याय' व 'संदर्भ' या कथांचा समावेश होऊ शकलेला नाही. या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन नवचैतन्य प्रकाशन यांनी प्रकाशित कलेले दिसून येते. या दोन्ही आवृत्यांमधील कथांचा परिचय आपण करुन घेणार आहोत.

सुधारीत आवृत्तीमध्ये 'एकदा जाग आली','वय','स्त्रोत','वाटा','हिवाळयातील पहिला दिवस','शिल्लक','प्रारंभी खेळाच्या','पावसाळयातली गोष्ट','दुसरं घर', 'चाफा','दुहेरी', 'खिडक्या' अशा एकुण १२ कथांचा समावेश केलेला आहे. तर पहिल्या आवृत्तीमध्ये या कथा असून 'स्वाध्याय' व 'संदर्भ' या दोन कथांची भर पडलेली दिसून येते. सानियांच्या लेखनाचा आवाका खूप मोठा आहे. सहजपणे जगण्यात आणि अलगदपणे लेखनात उतरणारी आणि तरीही अनुभवापासून दूर, तटस्थ राहणारी अशी ती लेखिका आहे असे विजय तेंडुलकर म्हणतात. पुढे ते असेही म्हणतात की, "तिच्या लेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे, त्यात कोठलीही चमकधमक ('फ्लॅशीनेस') नसतो. किंबहुना ते अगदीच फिक्या रंगात असते. तरी ते लेखन आपल्याला ठाय लयीत संथपणे आपले गाणे रंगवत जाणाऱ्या अमिरखाँच्या गायकीसारखे वाटते. ते कधीच द्रुत लयीत जात नाहीत. पण अमिरखाँचे गाणे संपले तरी त्याचे गुणगुणणे जसे श्रोत्यांच्या मनात सुरुच राहते, तसेच वाचून संपले तरी सानियाचे लेखनही वाचकाच्या मनात रुंजी घालत राहते, तिच्यातील लेखिकेचे हेच मोठे बळ मी मानतो."[१]

सानिया यांच्या कथेत आधुनिक भाषेचा जास्तीत जास्त वापर झाल्याचे दिसून येतो. उच्चवर्णीय स्त्रियांची दु:खे त्यांनी प्रसंगी इंग्रजी शब्दांचा वापर करुन प्रभावीपणे रंगविली आहेत. वाक्प्रचारांचा वापर त्या पदोपदी करताना दिसतात. 'मानवी नात्यांचा शोध' हेच

त्यांच्या लेखनाचे सूत्र असल्याने आई-मुलीचे, वडील-मुलगी यांचे नाते त्या जास्त प्रभावीपणे आपल्या कथातून मांडताना दिसतात. नणंदा, दीर, सासू अशी फारशी नाती त्यांच्या कथेत दिसून येत नाहीत. प्रसंगाला अनुसरुन त्यांनी निसर्गाची काही चित्रणे देखील रंगवली आहेत. अशा वातावरणनिर्मितीमुळे त्यांच्या कथेला चांगलाच उठाव मिळालेला दिसून येतो. माणसे जेव्हा जास्तीत जास्त काळ एकत्र असतात, तेव्हा त्यांना एकमेकांबद्दल समज नसते पण कित्येक वेळा तीच माणसे दूर गेल्यावर त्यांच्यामध्ये अधिक जवळीक निर्माण होते असे का होते? अशा प्रकारचे अनेक प्रश्न प्रत्येकाला पडत असतात. तसेच प्रश्न लेखिकेला पडले. या नाते संबंधाचा शोध कधीही न संपणारा आहे. तरीही त्याची उत्तरे लेखिकेला शोधावीशी वाटली. ती शोधली त्यांनी शब्दसाधनेतूनच. तोच ह्य त्यांचा साहित्य प्रवास होय. 'खिडक्या' या कथासंग्रहातील १४ कथा अशाच वेगवेगळया मानवी नात्यांचा शोध घेणाऱ्या आहेत असे म्हणावेसे वाटते.

अशा या कथांचा परिचय पुढीलप्रमाणे-

**१ ) एकदा जाग आली :-**

'खिडक्या' या सुधारीत कथासंग्रहातील ही पहिली कथा आहे. कथेची नायिका कालिंदी आहे. ती एका जाहिरात कंपनीत काम करायची. तिचा नवरा अभय एम.बी.ए. झालेला होता. त्यामुळे घरात आर्थिक सुबत्ता होतीच. अचानक एके दिवशी तिला तिचा मित्र वसू वेलणकर भेटतो. ते दोघे पूर्वी आर्टस्कूल मध्ये एकत्र शिकत होते. वसूमुळे तिला पूर्वीचे दिवस आठवले.वसूला आश्चर्य वाटत होते की, कालिंदी कशी काय जाहिरात रंगवत राहिली? वसू नेहमीच भटकंती करणारा, पैशाची चणचण असणारा माणूस होता. कालिंदीकडे येऊन तो 'मोठा' झाला होता. त्याने काढलेल्या पेंटिंग्जच्या प्रदर्शनाला चांगलाच प्रतिसाद मिळाला होता. पार्टीत देखील तो चांगलीच छाप पाडत होता. नेमके तेच कालिंदीला खटकत होत. तिच्या ऑफिसमध्ये देखील त्याच नाव आदराने घेतल्न जाई. कालिंदीला देखील पेंटीग करणे आणि जाहिराती बनवणे यातील फरक कळत होता आणि हा विचार तिला दुखावून जात होता. कित्येक वर्षात तिने स्वत: काही उचंबळून येत म्हणून ब्रश हातात घेतला नव्हता. ती जे काम करीत होती ते व्यवहारी होते, काल्पनिक नव्हते. पूर्वी आर्टस्कूलमध्ये असताना तिच्या मित्रमैत्रिणींच्या ग्रुपमध्ये एक प्रकारची धग

होती, जाग होती. ती धग वसूला कालिंदीत दिसली नाही. वसूच्या वाढत्या प्रसिद्धीमुळे तिचे कामात लक्ष लागेनासे झाले. तिला वाटू लागले की  जे आपण हरवू दिले ते पुन्हा मिळतय का ते बघावे? एखादा मोठा भव्य क्षण  येऊन त्यात रंगामागून रंग ओतून त्यात बुचकाळून जावे. पूर्वी असे क्षण येऊन गेले होते. त्या क्षणांना फुलवत रहायला हवे होते असे तिला वाटत होते. त्यात एखादा धगधगीत अग्नी मिळाला असता, त्यात हात भाजून निघाले असते तरी चालले असते. पण ही न मिळाल्याची खंत तिला कमी पोळत नव्हती.

कालिंदी, वसू आणि अभय एका पार्टीला गेले असताना कालिंदीने नेहमीपेक्षा जास्त ड्रिंक घेतली. रात्री खूप उशिरा अभयला न सांगताच एकटीच घरी आली. वसूच्या खोलीत जाऊन बोर्डवर हवे ते रंग फटकारले आणि तिथेच पडली. अभय घरी आल्यावर तिच्यावर जाम चिडला. पुढे दोन दिवसात वसू दोघांनाही न सांगता निघून गेला. त्याने कालिंदीच्या कोणत्याच वस्तूला हात लावला नव्हता. तिच्या डोळयात पाणी आल्यावर अभयने तिला वसूमध्ये गुंतली होती की काय? विचारले. पण वसूबद्दल कालिंदीला कधीच प्रेम वाटले नव्हते. तिला वाटले की, एके काळी माणसामध्ये जो आत्मविश्वास असतो, जी अनुभूती असते,ते सगळ नंतर नाहीसे होते आणि ते परत मिळवायचा अट्टाहास जागा होतो. ती जागच आता संपून गेली होती. वसूने जागी केली ती फक्त स्वप्ने होती.

कालिंदी वडिलांकडे गेली असताना तिच्या आर्टस्कूल मधील ग्रुपच्या रमणिक पटेलकडून कळले की, वसू आता गृहस्थी झाला आहे. आईने दाखवलेल्या मुलीशी मुकाटयाने लग्न केले होते आणि कुठेतरी नोकरी करत होता. नोकरी करण्यापेक्षा त्याने दोन-चार शोज केले असते तर तो कुठल्या कुठे पोहोचला असता. कालिंदी पटेल सांगत असलेल्या आठवणीत बुडून हरवून गेली.

माणूस पहिल्यापासून काही विशिष्ट ध्येय डोळयासमोर ठेवत असतो. पण काही वेळा परिस्थितीमुळे ती विसरली जातात. ज्यावेळी त्याची जाग येते ती जागच स्वप्नमय असते. आपण आपल्या खऱ्या कलेपासून वंचित राहिलो याचे दु:ख करणारी कालिंदी ही कथेची नायिका आहे. सानियांनी या कथेला दिलेले शीर्षक खरोखरच समर्पक आहे.

२ ) **वय :-**

'खिडक्या' या कथासंग्रहातील 'वय' ही दुसरी कथा आहे. या कथेमध्ये कॉलेजमध्ये असणाऱ्या निरागस, हळव्या प्रवृत्तीच्या अश्विनीची कथा सांगितली आहे. सुजाता ही तिची मैत्रीण आहे. अश्विनीच्या बहिणीचे दीप्तीचे लग्न कुमारशी ठरलेले होते. पण दीप्तीचे प्रेम मात्र मकरंद नावाच्या मुलावर होते. अश्विनीला दीप्तीचे हे प्रेम प्रकरण माहीत नव्हते. एकदा सुजाता आणि अश्विनी दोघी फिरायला बाहेर गेल्या असताना सुजाताने ही गोष्ट अश्विनीला सांगितली. हे ऐकून अश्विनीला धक्काच बसला. कुमारशी लग्न केल्यानंतर ते दोघे कॅनडाला जाणार म्हणून दीप्तीने फ्रेंच भाषेचा क्लास लावला होता. त्यामुळे तिला रोज घरी यायला उशीर व्हायचा. असे तिने घरी सांगितले होते. अश्विनीने कुमारविषयी बोलण्याचा प्रयत्न केला तर ती विशेष इंटरेस्ट दाखवायची नाही. अश्विनीने त्यांची पत्रे वाचण्याचा प्रयत्न केला पण 'प्रेम पत्रे' नव्हतीच. फक्त इकडची–तिकडची चौकशी होती.

अश्विनीला या सगळयाचे खूप टेन्शन आले होते. एका शनिवारी ती आईबरोबर सिनेमाला गेली असताना दीप्ती-मकरंद तिला दिसले. अश्विनी आईला सांगणार पण झटकन तिने दुसऱ्या बाजूने आईला थिएटरमधून बाहेर आणले. पुढे एके दिवशी पप्पांचे मित्र घरी जेवायला येणार म्हणून ती काहीतरी बाहेर आणायला गेली होती. दीप्ती आणि मकरंद यांच्या पाठीमागेच अश्विनी चालत होती. मकरंद तिला लवकरात लवकर सगळया गोष्टी घरी सांगण्याविषयी सांगत होता. पण दीप्तीला माहीत होते की तिच्या आणि कुमारच्या घरी हे सगळ माहीत झाले तर धक्का बसेल. अश्विनीने कुमारला सांगायचे ठरवले होते, पण त्या अगोदरच दीप्तीने पत्रातून कुमारला सगळी परिस्थिती कळविली होती. अश्विनीला वाटत होत की ही गोष्ट फक्त आपल्यालाच माहीत आहे. पण ही गोष्ट तिच्या आई-पप्पांना देखील माहीत होती. अश्विनीला आता तिच्या आई-पप्पांच्या वागण्याचा अर्थ कळत होता.

कुमार दीप्तीवर लग्नासाठी बळजबरी करणार नव्हता. कारण त्याला माहीत होते की संसारात सुख बळजबरीने ओढून आणता येणार नाही. तरी देखील दीप्तीला त्याने समजवावे असे तिच्या आई-पप्पांना वाटत होते. पण कुमारने दीप्तीचे लग्न मकरंदशी

करुन देण्याविषयी तिच्या आईला सांगितले होते. तो रागवला नव्हता. कुमार ज्या ज्या वेळी अश्विनीला भेटला होता त्यावेळी तो तिच्याशी खूप छान वागायचा. आताही त्याने तिच्या कॉलेजची चौकशी केली, पण अश्विनीला खर तर रडायला येत होते. पण ते रडणं खूप वेगळ होते. कुणालाच न सांगता येण्यासारख. कुमारबद्दल तिच्या मनात भावनांनी गर्दी केली होती. याची सुरवात कधी झाली आणि शेवट कसा होणार याची तिला कल्पना करता येईना. माणसाचे प्रेम कधी, केव्हा कोणावर जडेल सांगता येत नाही. तशी स्थिती कथेतील अश्विनीची झाली होती. तिला माहीत होते की कुमार आपल्या बहिणीचा होणारा भावी नवरा आहे. तरीही ती त्याच्याकडे आकर्षित झाली होती. खरोखरच अश्विनीचे 'वय'च अस होत की तिला कुमारबद्दल प्रेम वाटावे.

**३ ) स्त्रोत :-**

'स्त्रोत' ही सानिया यांच्या 'खिडक्या' कथासंग्रहातील तिसरी कथा आहे. 'स्त्रोत' या कथेतील किशोरी तिच्या कॉलेजमध्ये असणाऱ्या चारुहासवर अतिशय उत्कट प्रेम करायची. चारुहासबरोबर राहण्याच्या तिच्या हट्टामुळे वडिलांचा तिच्यावर राग होता. वडिलांचा विरोध पत्कारुन तिने चारुहासबरोबर लग्न केले होते. त्यामुळे लग्नाला दहा वर्षे होऊन देखील वडिलांनी तिची साधी विचारपूस देखील केली नव्हती. त्याचबरोबर किशोरीला मित्र, मैत्रिणी, शाळा, कॉलेज या सगळयावर पाणी सोडाव लागल होते.

एकदा तिला शिकवणारे भगत सर तिच्या घरी आले होते. सरांमुळे तिला भूतकाळातील गोष्टी आठवू लागल्या. सरांच्या घरात ज्या गप्पा चालत त्यातूनच ती चारुहासच्या प्रेमात पडली. सगळयांच्या लक्षात येईल असेच तिचे वागणे होते. चारुहासने प्रथम दुर्लक्ष केले. नंतर तो देखील मऊपणाने वागू लागला. भगत सर तिला आपली मुलगीच मानत होते. सरांनीच पुढाकार घेऊन चारुहासचे व तिचे लग्न लावून दिले होते. तिच्या आयुष्यात सरांनी मित्र, वडील, मोठा भाऊ, शिक्षक या भूमिका पार पाडल्या होत्या. त्यामुळे तिला सरांबद्दल आदर, जिव्हाळा होता.

केदार हा तिच्या कॉलेज ग्रुपमधील एक मित्र. किशोरी अगदी ज्याप्रकारे उत्कट प्रेम चारुहासवर करीत होती अगदी तसेच प्रेम केदार हा किशोरीवर करत होता. केदारने विद्ध,करुण,एकाकी,उत्कटतेने लिहलेली कवितेची वही तिला वाचायला दिली होती.

किशोरीने त्याला खोटेच सांगितले की, वाचायला वेळ मिळाला नाही. पण तिने अक्षरश: रात्रीचे जागून त्या कविता वाचल्या होत्या. तिला वाटायचे की, केदारला कळत कसे नाही की तिचे चारुहासवर प्रेम आहे.

लग्न झाल्यावर सुरवातीला किशोरीने चारुहासबरोबर भ्रमंती चालू केली होती. पण नंतर ती एके ठिकाणी रमली आणि स्वत:ला बागकामाचा छंद लावून घेतला होता. सर आता तिच्याकडे आले होते. सरांनी सांगितले की त्यांची नोकरी गेली होती. कारण सर ब्राम्हण नव्हते आणि कर्मठ विद्यापीठाची निर्मिती केली जात होती. सरांचे चारुहासकडे काम होते. त्यांना नोकरी नको होती. चारुहास आपल्या साप्ताहिकामधून यावर काहीतरी आवाज उठवेल असे त्यांना वाटत होते. पूर्वी फक्त चारुहाससाठी रात्री-अपरात्री त्यांच्या कंपूबरोबर फिरायची. तो तिला सतत आणि सर्वस्वी तिच्यासाठी हवा होता. पण या दहा वर्षात किशोरीला जाणवले होते की, आपण अबोलपणे आतल्या आत मिटून गेलो आहोत. काही खंत, तक्रार वाटत देखील नाही. चारुहास देखील म्हणायचा की तिच्यातील काहीतरी हरवून गेले आहे. कारण पूर्वी ती सारखी बोलत असायची. किशोरीला बोलायला सारखी माणसे हवी असत. पण आता ती एकटीच रहात होती.

चारुहास येताना केदारला घेऊन आला. पूर्वीचा केदार आणि आताचा केदार यात बराच फरक पडला होता. आठ दिवसानंतर सर जायला निघाले. सरांपाठोपाठ केदारही जायला निघाला. किशोरीने थांब म्हणताच तो तिला म्हणाला की, त्याचे आयुष्य पुष्कळ चारुहाससारखे आहे. पण मार्ग भिन्न आहेत. किशोरीच्या आणि चारुहासचे लग्न झाल्यानंतर निराशेच्या भरात त्याच्या हातून काहीतरी घडले असते. पण सरांनी त्याला वाचवले होते. दिशा एकच न ठेवता त्याने खूप काम केले. अगदी हॉटेलमध्ये टेबल पुसण्यापर्यंत आणि जी दिशा, जो अनुभव त्याला आला होता तसाच अनुभव किशोरीला आला होता. वाटा पुष्कळ चालून गेले तरी मागचं काहीच विसरता येत नाही. केदारचे बोलणे ऐकून किशोरीने ठरवले की चारुहास आला की, आपणही त्याच्याबरोबर भ्रमंती करायची.

वडिलांची संपत्ती नाकारुन, आपल्या प्रेमासाठी किशोरी ठिकठिकाणी चारुहासबरोबर फिरली. वडिलांशी संबंध ठेवला नाही. अशी या कथेची बंडखोर नायिका

आहे. माणसाच्या आयुष्यात प्रेम महत्वाचे असते आणि त्यासाठी काहीही करायला माणूस तयार होतो. हेच या कथेतील केदारने आणि किशोरीने दाखवून दिले आहे.

**४) वाटा :-**

'वाटा' या कथेमधून सानियांनी आधुनिक स्त्रीचे चित्र रंगवले आहे. मिनू आणि अनिरुद्ध दोघे नवरा-बायको. ती ऑफिसमध्ये काम करायची. तो कारखान्यात काम करायचा. प्रसंगी तो तिला घरकामातही मदत करायचा. पण साधा चहा करण्यावरुन दोघांचे भांडण होत असे. तिच म्हणणे असे होते की, तिचा नवरा जसा काम करतो. तसेच ती देखील करत असते. ती स्वत:च त्रागा करुन म्हणायची की, तो तिची नोकरी दुय्यम मानतो. त्यामुळे तिची नोकरी, पैसा, स्टेटस कमी. अनिरुद्धचा कारखान्यातील दिवस महत्वाचा, पण बायकोची त्याला किंमतच नाही. मिनूला त्याने केसांची फॅशन बदलायला सांगितल्यावर त्याने उद्या बेडौल झाल्यावर टाकून देशील की काय? म्हणून उडवून लावले. पार्टीत देखील ती कधीतरी जास्तच घेई. असे त्याने सांगितल्यावर त्याला म्हणाली की, माझा तोल कधीही गेलेला नाही. मिनू रोज उशिरा घरी येऊ लागली. यावर त्याने हटकले तर ती त्याला म्हणायची, रोज लवकर येऊन त्याची वाट बघत बसावी लागते. त्यापेक्षा ती त्याच्या ऑफिसमधल्या मित्राशी गप्पा मारत बसते. त्याचा सहवास तिला आवडायचा. पण तिने पुढची मर्यादा ओलांडली. तिने त्याच्याबरोबर एक रात्र घालवली होती. लग्नासारख्या पवित्र बंधनाला तिने कलंक लावला होता. हे ऐकून अनिरुद्ध चिडला होता. त्याने दिलेल्या स्वातंत्र्याचा तिने गैरफायदा घेतला होता. हे अनिरुद्धला शिक्षा देण्यासाठी, त्याचा सूड घेण्यासाठी तिने असे केले होते.

पॅथॉलॉजिकल लॅबमधील तिची मैत्रीण, सरोजिनी मिनूच्या चांगल्या ओळखीची होती. मिनूचा प्रेगनन्सी रिपोर्ट पॉझिटिव्ह आला होता. हे अनिरुद्धला सांगायची हिंमत मिनूत नव्हती. सरोजिनीने तिच्या नवऱ्यापासून घटस्फोट घेतला होता. कारण तो दुसऱ्या स्त्रीमध्ये गुंतला होता. आपण एकटेपणाने सहज राहू शकू असे तिला वाटत होते. पण आता तिला पश्चाताप झाल्यासारखा वाटत होता.अनिरुद्धच्या घरी काम करणाऱ्या शकूनचे लग्न ठरले होते म्हणून ती खुशीत होती. पण तिच लग्न दुसरेपणावर ठरले होते. नंतर तिची अवस्था इतर बायकांसारखीच होणार होती असे मिनूला वाटले.

अनिरुद्धच्या आई-वडिलांनी संसाराची चाळीस वर्षे पूर्ण केली होती. आणि तो त्यांनी छानसा कार्यक्रम घेऊन साजरे करावयाचे ठरवले होते. जिथे आपल्याला पाच वर्षे काढताना नको वाटली, तिथे त्यांनी चाळीस वर्षे कशी काय काढली? असे मिनूला वाटले. तिच्या ऑफिसमधल्या मित्राचा परत फोन आला होता. ती त्याला आणखी एक दिवस हवी होती. तिचे हात-पाय भीतीने कापू लागले. ममी-पप्पांच्या कार्यक्रमात दोघांनी खूप खुश असल्याचे नाटक वठवले. घरी जाताना मिनूने त्याला आतापर्यंतची सर्व परिस्थिती सांगितली. अनिरुद्धला हे सगळ अगोदरच माहीत होते. तो तिला म्हणाला की, अस होत राहणारचं. यातूनच पुढे वाट काढायची असते. तिथच थांबून रहायचे नसते. मिनूच्या लक्षात आले की, त्यानेच तिला कितीतरी गोष्टी स्वतंत्रपणे जाणून घेण्याची संधी दिली आहे. आज देखील मिनूसारख्या कितीतरी स्त्रिया समाजात असतील हे सानिया यांनी आपल्या 'वाटा' या कथेतून दाखवून दिले आहे.

**५ ) हिवाळयातील पहिला दिवस :-**

सानियांच्या 'खिडक्या' कथासंग्रहातील ही पाचवी कथा असून त्यामधून त्यांनी एका बर्वे नावाच्या प्राध्यापकाचे चित्रण रंगवले आहे. ते कॉलेजमध्ये शिकवत होते. परंतु ते पहिल्यापासूनच भित्र्या प्रवृत्तीचे होते. सगळं जीवन आखीव, रेखीव अणि शिस्त तर पहिल्यापासून त्यांच्या अंगी होतीच. त्यांच कुटूंब सुखवास्तु होते. नेहमीप्रमाणे फिरायला बाहेर पडल्यानंतर त्यांना बऱ्याच आठवणी अणि बरेच चेहरे आठवले.

टयुटर म्हणून लागल्यावर त्यांना देशपांडे नावची मुलगी आवडली होती. पण पुढे काही घडलच नाही. लग्न झाल्यावर मिस चक्रवतीच्या प्रेमात पडण्याचा प्रयत्न केला पण त्यांच्या उतावीळपणामूळे तिचा लोभ हरवून बसले. तिसरी आठवण त्यांच्या कॉलेजमधील मुलाची सांगितली आहे. त्याचे नाव मंगेश मोकाशी. एकदा मारामारीच्या लफडयात तो अडकला. बर्व्यांना खरी माहिती माहीत होती, पण त्यांनी सरळ काखा वर केल्या. कॉलेजने त्याला रस्टिकेट केले. तो बर्व्यांना काही दिवसांनी भेटला, सर फार घाबरले होते. पण अजूनही मंगेशच्या मनात त्यांच्याबद्दल आदर होता. बर्व्यांना नोकरी टिकवायची होती ती सद्धा मानाने आणि रीतीला धरुन. त्यांना कुणी 'गुंडाचा आवडता प्राध्यापक' असे म्हटले असते तर हस्यास्पद झाले असते म्हणून त्यांनी काढता पाय घेतला.

थंडी सुरु झाल्यामुळे त्यांच्या स्टाफमधील सर्वांनी 'ओली पार्टी' करायची ठरवली होती. बर्व्यांच्या मनात इच्छा असूनसुध्दा त्यांनी प्रमाणाबाहेर कधीसुद्धा घेतली नव्हती. त्यांची क्रांती नावाची एक विद्यार्थिनी होती. तिच्या डोक्यात कम्युनिझमचे वेड होते. पुढे प्रेमात पडल्यावर सगळं विसरली. बर्वे लॉजीक शिकवत होते. त्यांचा दरारा आणि वचक होता. पण आज त्यांना काहीतरी वेगळच सांगून मुलांना हसवण्याची इच्छा होत होती. त्यांचा कधी कुणी अपमान केला नव्हता. पण इतकी वर्षे मन लावून शिकवूनही त्यांना हात रिकामेच वाटत होते. प्राध्यापकाचे आयुष्य म्हणजे लग्न, संसार, कॉलेज आणि तेवढचं विश्व. फिरायला गेलेल्या बर्व्यांना वाटले की, मनाला गुंतवाव लागत नाही. पायांना तर इतकी सवय होते की चालतच राहतात. संध्याकाळ होताच आपल उभं आयुष्य सरत येऊ लागले आहे असे त्यांना वाटले. माणसांच्या सवयीपायी सुटलेल्या क्षणांची हळहळसुद्धा त्या सवयीत येऊन जात असावी. असा विचार करत बर्वे उठले.

या कथेतून सानिया यांनी अतिशय भित्र्या प्रवृतीच्या आणि शिस्तबद्ध प्राध्यापकाचे चित्रण दाखवले आहे.

**६ ) शिल्लक :-**

या कथेतून सानिया यांनी दोन मैत्रिणींची कथा सांगितली आहे. 'शिल्लक' कथेतील 'मी' एक साधी, शांत, सिन्सिअर मुलगी आहे. ती अकाऊटंट म्हणून काम करायची तर कस्तुरी तिच्या दृष्टीने भडक, नटवी, आळशी, बडबडी.ती हॉटेलमध्ये हाऊसकीपर म्हणून काम करायची. कस्तुरीचे जीवन सुखसोयीने भरलेले होते. पण 'मी' ला दर महिन्याला काहीतरी शिल्लक ठेवण्याची आवश्यकता वाटे.

'मी' ची ओळख संतोष नावाच्या डॉक्टरशी होते. तो हॉस्पिटलमध्ये कामाला होता. तिचे त्याच्यावर एकतर्फी प्रेम होते. पण तो तर तिच्याशी मैत्रीच्या नात्यानेच वागायचा. एकदा 'मी' ने त्याच्यासाठी खूप छान जेवणाचा बेत केला. पण संतोष तर्र दारु पिऊन रात्री दोन वाजता आला. सोबत त्याने मित्रालापण आणले होते. तिचा मूड गेला होता त्या दोघांना निवारा हवा होता म्हणून तिच्याकडे आले होते. सकाळी कस्तुरी यायच्या अगोदर ते निघून गेले.

इकडे संतोषची जवळीक साधण्याच्या नादात तिचा कस्तुरीशी दुरावा वाढत चालला. दोघीत खटके उडू लागले. त्या रात्री दिलेल्या आसऱ्याबद्दल संतोषने तिला पेनचे बॉक्स देऊ केले. पण तिने ते नाकारले कारण तिला भीती वाटली की ती गोष्ट कस्तुरीला कळेल. पुढे ती कंपनीच्या ट्रेनिंगसाठी संतोषला न सांगताच अहमदाबादला गेली. परत आली तर एक वस्तू जाग्यावर नव्हती वर स्वयंपाकीण काम सोडून गेली होती.

ती बाहेर जाऊन काहीतरी खाऊन यावे या हेतूने निघाली. तोच दारात संतोष उभा. त्याने कस्तुरीची चौकशी केलेली तिला आवडली नाही. तिने दोघी वेगळया राहणार असल्याचे सांगितले. पण संतोषला तिचा कस्तुरीवर एवढा राग का? हेच कळत नव्हते. तिला वाटू लागले की, संतोष आणि कस्तुरी दोघेही आपल्यापासून दूर जात आहेत. आयुष्यातल्या छोटया छोटया गोष्टीच एकमेकाबरोबरची नाती स्पष्ट आणि अस्पष्ट करत जातात. पुढे अचानक कस्तुरी आजारी पडते. तिने तिच्याकडे प्रथम दुर्लक्ष केले पण पुढे जास्तच अशक्त दिसू लागल्यावर तिची काळजी घेऊ लागली. पण फरक पडत नव्हता. तिने संतोषला कस्तुरी आजारी आहे हे सांगण्यासाठी फोन केला तर त्याने साखरपुडा झाल्याची न्यूज दिली. कस्तुरीला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करून ग्लुकोजवर ठेवण्यात आले. ती खूप सिरीयस होती. तिला कस्तुरी आजारी असण्याच्या काळातील आपण कसे मूर्खपणाने वागलो याचा पश्चाताप झाला. त्याच काळात तिने संतोषजवळ आपले प्रेम व्यक्त केले पण आता खूप उशीर झाला होता. ती वेळ हे सर्व सांगण्याची, बोलण्याची नव्हती. कस्तुरी एका रात्री गेली. घरी आल्यावर तिला कस्तुरीच्या वस्तू बघून जास्तच रडायला येत होत. तिचे वडील जाताना कस्तुरीच्या काही वस्तू देऊन निघून गेले. संतोष शेवटी म्हणाला की, कधी कधी आपल्याला काहीच वाचवता येत नाही. यावर तिने प्रथमच समजल्यासारखी मान डोलावली.

या कथेतील दोघीही कामानिमित्त घरापासून लांब राहिल्या होत्या. यामधून त्या दोघीत निर्माण झालेले बंध आणि दोघीत निर्माण झालेला कायमचा दुरावा खूप चांगल्या रीतीने स्पष्ट करून सांगितला आहे.

७ ) **प्रारंभी खेळाच्या :-**

'प्रारंभी खेळाच्या' कथेतील नंदिताला नियतीने तिच्या नवऱ्यापासून कायमचे वेगळे केले होते. तिला खूप शिकण्याची इच्छा होती. तिला उंच, ताकदवान, खूप शिकलेला, उत्तम नोकरी असणारा, स्वत:चा खूप पैसा, हवा तसा पुरुष हवा होता. तिच्या वडिलांनी तिच्या बहिणीच न शोभणाऱ्या एका माणसाशी तिच लग्न लावून दिले होते. पुढे ती आजारी होती. माहेरी आल्यावर सासरच्या तक्रारी परत येता कामा नयेत असा वडिलांनी दम भरून तिची इच्छा नसतानाही तिला परत सासरी पाठवले. वडिलांच्या अशा तापट, हट्टी स्वभावामुळे आपली स्थिती अशी होऊ नये म्हणून तिने जवळच्या मैत्रिणीच्या नातेवाईकाशी लग्न केले. तिला घरातून सुटायच होत. लग्न केले पण शिक्षण अपूर्ण राहिले. घरातील भांडणात दोन वर्षे निघून गेली. त्या काळात तिचे आणि नवऱ्याचे नात तिला कळलेच नव्हते. चारचौघांसारखा त्यांनी शरीराचा सहवास मिळवला होता. पण नंदिताला शारिरीक सहवासापेक्षा विलक्षण खोलवरच्या प्रेमानंतर, संबंधानंतर शरीरांनी संवाद साधता येतो का? हे बघायचे होते. पण तेवढयात तिच्या नवऱ्याचा मृत्यू झाला.

नंदिताने टाईपरायटरची कंटाळवाणी नोकरी पत्करली. 'वाचकांचा पत्रव्यहार' मधून तिची आणि किरणची ओळख झाली होती. नुकतेच त्याचे एक पुस्तक प्रकाशित झाले होते आणि त्याला बक्षीसही मिळाले होते. तिच वय त्याच्याहून दोन-तीन वर्षांनी जास्तच होते. तिने किरणला आपली सर्व हकीकत सांगितली. तिला वाटत होते की, आपण किरणला खेळवत आहोत. किरण एकदा तिला त्याच्या घरी घेऊन गेला होता. घर एकटयाचे असावे अगदी तसेच होते. तो बाहेरचे वातावरण विसरण्यासाठी रेकॉर्ड लावत असे. तो संग्रह त्याला कोणी भेट दिला होता. आयुष्यातील काही महत्वाच्या आठवणी प्रौढपणा शिकवून जातात, असे किरणला वाटते.

नंदिताचं आयुष्य सरळ, संथ तर किरण निखळ, प्रसन्न चेहरा. नंदिताला ही पूर्वी रेकॉर्ड खरेदी करुन ऐकण्याची खूप इच्छा होती. पण तिला ते जमले नाही. नंदिताची कथा ऐकून किरणचे जीवनच बदलले. पुढे बरेच दिवस तो तिला भेटला नाही म्हणून ती त्याच्या घरी गेली तर त्याने रेकॉर्डचा संग्रह विकायला काढला होता. त्याने स्वप्नमय, भाबडे आयुष्य जगण्यापेक्षा नंदितासारखे आयुष्य जगायचे ठरवले होते. तिला वाटले की,

किरणचे जगच आपल्याला दूर नेत आहे. किरण भटकणारा, लिहिणारा, कंगाल होता. जाताना निरोप म्हणून एकीने तो संग्रह त्याला भेट दिला होता. आजारपण, मृत्यू, एकटेपणा, जगण्याची केवळ धडपड हे तर खर आयुष्य होय. गाणी, स्वर म्हणजे खोटं आभासमय आयुष्य असते हे त्याला पटले होते. त्यात त्याला त्याच्या पुस्तकाचा तोटा झाला होता. नंदिता जर नवऱ्याच्या मृत्यूच्या घटनेतून निरोप घ्यायला शिकली होती, तर त्याच्या सारख्या एका व्यक्तीचा निरोप घेणे अवघड नव्हते. नंदिताला हुंदके दाटून येत होते. पण किरणने आपला निरोप सोपा करुन ठेवला होता.

'प्रारंभी खेळाच्या' हे शीर्षक किती समर्पक आहे. पहिल्यांदा नंदिताचा संसार कुठे फुलत होता, तेव्हा नियतीने तिच्या नवऱ्याला तिच्यापासून दूर नेले होते आणि किरण बरोबर आताच कुठे बंध जुळत होते तेही नियतीने तिच्यापासून हिरावून घेतले.

**८ ) पावसाळयातली गोष्ट :-**

'पावसाळयातली गोष्ट' कथेतून सानियांनी मोनिका नावाच्या उच्चभ्रू वर्गातील स्त्रीची कथा सांगितली आहे. मोनिका श्रीमंत घराण्यातील तर विद्याधर एक साधा लेखक, तत्वज्ञ. मोनिकाने पुढाकार घेऊन त्याच्यापुढे लग्नाचा प्रस्ताव ठेवला. तेव्हा त्याने तिला पुढील अडचणी, धोके सांगण्याचा त्याने प्रयत्न केला. तिला ते दिसत होते पण ती हट्टी होती. लग्न करेन तर विद्याधरशीच. त्यामुळे तिच्या आई-वडिलांनी जास्त ताणून न धरता दोघांचे लग्न लावून दिले होते. लग्नाअगोदर तो शिकवत होता पण ते तात्पुरते होते. काही दिवसातच तो राजीनामा देऊन फक्त लिहणार असल्याचे सांगितले. पण मोनिकाला माहीत होते की लेखकाला जास्त पैसे मिळत नसतात. त्याच्यासारख्या दुर्बोध लेखकाला तर नाहीतच. त्याच्या ग्रुपमध्ये मोनिका हिरिरीने चर्चा करत असे. विद्याधरचे बोलणे ऐकून तिला वाटे की, आयुष्य फक्त यालाच कळलेले आहे. मोनिकाच्या आईने एक श्रीमंत स्थळ तिच्या भाचीला काढले होते. मोनिकाला त्या स्थळाबद्दल विचारताच तिने नकार दिला होता. पण विद्याधरची खोली पाहताना तिला गुदमरल्यासारखे झाले होते.

लग्नानंतर मोनिकाला खरे आयुष्य कळाले होते. पैशाची चणचण तर सारखी होतीच. पण स्वाभिमानी असल्याने वडिलांना काहीच सांगायची नाही. ते देखील अप्रत्यक्षरीत्या काही ना काही मदत करायचे. पण मोनिका हल्ली जास्तच त्रागा करुन

घेत होती. पूर्वी जे स्वीकारायची, तरुन जाण्याची जिद्द होती ती आता कुठे गेली होती? हेच तिला कळत नव्हते. मोनिका आपले पूर्वीचे जीवन विसरु शकत नव्हती. विद्याधरच्या पुस्तकाला सरकारी पारितोषिक मिळणार होते. पण त्याने ते नाकारायचे ठरवले होते. मोनिकाने ते किती रुपयांचे होते विचारताच या गोष्टी तत्वावर असल्याचे त्याने सांगितले आणि मोनिका इतकी शून्य कधीपासून झाली? मोनिका म्हणायची की श्रीमंत, कमविणारी बायको म्हणून त्याने लग्नाला होकार दिला. हाच प्रश्न त्याच्या मनात असावा. या प्रश्नाचे उत्तर ती मागत होती. पण अशा प्रश्नांची उत्तरे मागायची नसतात. ती आपली आपण शोधायची असतात असे विद्याधरचे मत होते.

रती मोनिकाच्या आईची भाची, मोनिकाकडे येणार होती. ती जग प्रवास करुन आली होती. पण तिच्या मनात विद्याधरविषयी उत्सुकता होती. घरी आली त्यावेळी ती खूप मनमोकळेपणाने सगळयांशी बोलली. त्याच वेळी विद्याधरकडे एकजण आला होता.तो खूप वाईट परिस्थितीत होता. म्हणून विद्याधरने त्याला आपल्याकडे रहायला बोलावले होते. त्यावरून मोनिका आणि विद्याधर यांच्यात वाद झाला. ती त्याला म्हणाली की त्यानेच त्या व्यक्तीला बोलावले असेल कारण त्याचा स्वभाव म्हणजे स्वत: बुडता बुडता दुसऱ्याला वाचवायचा. रतीला ही गोष्ट जेव्हा मोनिकाने सांगितली त्यावेळी ती म्हणाली की, मोनिका म्हणूनच निभावून नेते पण विद्याधरसारखा माणूस असल्यावर भीतीचे काही कारणच नाही. विद्याधरला ओळखण्यात मोनिकाच कुठेतरी कमी पडत आहे.

पुढे तिला दिवस गेले. पण तिला वाटत होते. आपल्याला मूल आहे त्या परिस्थिती मध्ये झेपणार नाही. यावर विद्याधरनेच तिची समजूत काढली की, आपल्याकडे देण्याजोगे खूप काही असते. पंधरा वर्षांनी मागे वळून पाहिल्यावर हे प्रश्न इतके अवघड वाटणार नाहीत. माणसाने नेहमी उजळ बाजू पहावी. असा हा बुद्धिमान समजला जाणारा लेखक आपल्याला लहान सहान गोष्टी समजावतो आहे याचे तिला हसू आले. सगळेच पटले नसले तरी तशी सुरवात झाली होती.

अशा प्रकारे या कथेतील विद्याधरने दाखवून दिले की, प्रेम जर खरे केले असेल तर तसे ते टिकवायची ताकद हवी. आहे त्या परस्थितीत जर समाधान मानण्याचा प्रयत्न

केला तर संसार सुखाचा होतो हाच संदेश सानियांनी 'पावसाळयातली गोष्ट' या कथेतून दिला आहे.

**९ ) दुसरं घर :-**

'दुसरं घर' कथेत सरळ, साधी, कॉलेजला जाणारी साधना या मुलीचे चित्र सानियांनी रंगवले आहे. ती आणि तिची मैत्रीण शोभा दोघीही अबोल, शांत त्यामुळे फारशा मैत्रिणी तिला नव्हत्याच. त्या दोघीही नियमितपणे कॉलेजला जायच्या, तरीही जेमतेम गुणावरच पास व्हायच्या. अन्य कोणत्याही कार्यक्रमात भाग घ्यायच्या नाहीत. त्यामुळे त्या कुणाच्या खिजगणतीत नव्हत्या. पुढे एस.एस.सी. झाल्यावर शोभाने शिक्षण थांबवले. तिच लग्नही ठरले. पण साधनाने वडिलांच्या आग्रहास्तव पुढे शिकायचे ठरवले होते. वडिलांना ती दादा म्हणायची तर आईला माई म्हणायची.

साधना दादा आणि माई मध्ये तुलना कारायची. माई दादांपेक्षा जरा बारीक आणि गबाळीच. तर दादा उंच व भारदस्त. साधनाची पाठची भावंड गेलेली. त्यामुळे ती एकटीच. दादा कंपनीच्या फिरत्या नोकरीवर होते. त्यामुळे ते महिन्यातून एकदा घरी यायचे. दादा आले की घरचे वातावरण बदलायचे. ती साधी असली तरी तिला टापटिपीची फार आवड, आकर्षण होते. त्यामुळे ती तिच्या गल्लीतील शैलाताईकडे ती आकर्षित व्हायची. त्या आधुनिक पद्धतीने राहणाऱ्या होत्या. त्यांनीच प्रथम इकडची तिकडची, नंतर साधनाच्या कॉलेजची,कॉलेजच्या अभ्यासाविषयी चौकशी केली. दादांचे दुसरे घर असल्याचे त्यांनीच सांगितले. तिला प्रथम काही कळालेच नाही आणि उत्तर देणही जमले नाही. जणू काही चूक तिचीच होती.

या गोष्टीने मात्र तिच्या मनात विचारांचे वादळ उठले. आतापर्यंत तिच जग शिक्षणापर्यंत मर्यादित होते. पण आता कुठेतरी फसल्याची जाणीव तिला होत होती. दादा अचानक आले. तिने सरळ विचारले की तुमचे तिकडे दुसरे घर आहे ना? पण दादा गप्प बसले.यावेळी जाताना तिला घेऊन गेले. घर आधुनिक पद्धतीचे होते. तिची ओळख न करुन देताच दादा आत निघून गेले. तिच नाव मुक्ता. अरविंद आणि अविनाश ही तिची दोन मुलं. तिने मुलांना साधनाची ओळख तुमची मोठी बहीण समजा अशी करुन दिली. दादा तिला एकेरी नावाने हाक मारीत होते. साधनाला आश्चर्य वाटले कारण हेच दादा

माईशी अगदी परक्याप्रमाणे, अहो-जाहो करायचे. दादांनी या गोष्टीची साधनाला कल्पना द्यावी असे मुक्ताने सांगितले होते. ती स्वत:विषयी सांगू लागली. तिचा नवरा वारल्यावर घरच्या लोकांनी तिला बाहेर हाकलले. माहेर नव्हतेच, दोन मूले वाढवत शिकवत होती. मुलांना वडील हवेत म्हणून दादांनी तिच्याशी लग्न केले होते. शिवाय आपल्या समाजात एकटया स्त्रीला कुठल्या समस्येला तोंड द्यावे लागते हे दादांना माहीत होते. म्हणजे माईने सगळे समजून होकार दिला होता. दादा मरेपर्यंत माईची आणि साधनाची काळजी घेणार होते. साधनाला आज दादांच्या एका रुपाबरोबर दूसऱ्या रुपाचे दर्शन घडले होते.

साधना माईला वेडी समजायची. पण तिच्या दृष्टीने आज ती स्वत:च वेडी ठरली होती. कारण दादा दुसरं घर उभारताना ती काय करीत होती? ती नव्याने विचार करण्याचा अनुभव शिकत गेली. तिला वाटले की आज आपण जो विचार करीत आहोत, उद्या विचार करु तो वेगळा असेल. त्यामुळे आपला उद्रेक, जाणीवा, प्रतिक्रिया सगळच निराळ असेल. ती परत जायला निघताच मुक्ताने तिला तू परत येशील का? विचारले. साधना हा प्रश्न सोबतीला घेऊन प्रवासाला निघाली.

साधनासारख्या साध्या,भोळया मुली बऱ्याच असतात. काही स्त्रिया त्याचा गैरफायदा कशा घेतात हे शैलाताईंच्या रुपाने सानियांनी दाखवून दिले आहे. त्याचप्रमाणे किशोरवयीन अवस्थेत एखाद्या घटनेचा किती मोठा परिणाम होतो हे साधनाच्या रुपात दिसून येतो.

**१० ) चाफा :-**

'चाफा' कथेतून सानिया यांनी तरुण कॉलेजकुमार रत्नाकरचे चित्रण केले आहे. रत्नाकर या कथेतील नायक आहे. तो त्यालाच शिकवणाऱ्या देवधर सरांच्या मुलीच्या प्रेमात पडला. तिचे नाव बीना.तिची बहीण सोनू. रत्नाकर आणि बीना दोघेही बी.एस.सी मध्ये शिकत होते. रत्नाकरने बीनाला लग्न करशील का? विचारल्यावर तिने हो-नाही काहीच न सांगता फक्त थांबायला सांगितले. त्यामुळे त्याचे अभ्यासावरील लक्ष उडाले. तो हुशार होता. बीना आणि त्याच्यामध्ये स्पर्धा चालत असे. पण आता मात्र त्याचे मन बीनासाठी झुरत होते. एमेस्सी न करता तो नोकरी करु लागला. त्याला दुसरी नोकरी हवी होती म्हणून तो देवधर सरांच्याकडे आला होता.

सरांनी त्याला पहिली नोकरी सुटण्याचे कारण विचारल्यावर त्याने तिथे जातीय प्रस्थ फार होते म्हणून सांगितले. खरं तर ती नोकरी चांगली होती. पण त्याला नऊ ते पाचची नोकरी हवी होती. एक चांगला प्रोजेक्ट होता. पण आडगावी होता. दिवस रात्र काम केल्यावर चांगले पैसे मिळाले असते. पण त्याने ते नाकारले आणि दुसऱ्याने ते उचलून धरले. त्यामुळे आता तो ज्या कंपनीत इंटरव्ह्यूसाठी जाणार होता, त्याचा मालक सरांचा विद्यार्थी होता. आपल्या नावाची शिफारस सरांनी त्यांच्याकडे करावी यासाठी तो सरांकडे आला होता. सरांच्या दारात एक चाफ्याचे झाड होते. बेल वाजल्याबरोबर सोनूने दार उघडले. ती नवव्या महिन्यात सरांकडे आली होती. त्याला बसायला सांगून ती आत निघून गेली. सरांना रत्नाकरला बघून आनंद झाला. सरांनी त्याला आवडता विद्यार्थी असल्याने आपटे उद्योग समूहाच्या मालकाकडे शब्द टाकायचे मान्य केले.सरांनी सोनूला ओळख सांगितली. रत्नाकरला वाटले त्याचे आणि बीनाचे तिला माहीत असावे. सोनू धाकटी होती. पण बीनापेक्षा सुंदर होती. तिला लग्नाबद्दल विचारले असते, तर ती सहज 'हो' म्हटली असती असे त्याला वाटले.

बीनाची चौकशी केल्यावर ती सध्या लंडनमध्ये असल्याचे सांगितले. तिचा नवरा फॉरेन सर्व्हिसमध्ये होता. ती एमेस्सी फर्स्टक्लासने पास झाली होती. नंतर ती जिथे शिकली त्याच कॉलेजमध्ये शिकवत होती. सरांनी त्याला एमेस्सीचे विचारल्यावर परिस्थितीमुळे जमले नाही अस खोटच सांगितले. सर त्याला म्हणाले की, नोकरी करायचीच असते पण शिक्षण एकदा सुटलं की सुटलं. बीनाचे लंडनमध्ये काही रीसर्च करण्याचे बेत होते. सरांच्या घरातून बाहेर पडताना त्या दोघींचे विचार रत्नाकरच्या डोक्यात होतेच.

घरी जाताना त्याला जुना मित्र नरेश भेटला. त्याच्याबरोबर संध्याकाळी खूप प्यायला. नरेशने त्याचा बीनामध्ये जीव होता म्हणून हटकले. त्याला वाटले चांगल्या गोष्टी आपल्या हातून निघून गेल्या. बीना त्याला म्हणाली होती की, अशा गोष्टी डोक्याने करायच्या असतात. अजून खूप काही मिळवायचे आहे. ते मिळवले की बघू. पण तोपर्यंत त्याला दम धरवला नाही. त्याला वाटले की आपण उगीच सरांच्या घरी गेलो. अगदी खुजट व्हायचे ठरविले की कुठे मर्यादाच रहात नाहीत. चालता चालता त्याचा तोल जाऊ

लागला म्हणून तो झाडाला टेकून थांबला. त्याला ते झाड चाफ्याचे वाटले. त्याने ते कवटाळले. त्याला वाटले की आपण हरवण्याचे साधन तर होणार नाही ना? की कुणाचे लक्ष जाणार नाही? त्याला एवढी चढली की त्याला काहीच आठवेना म्हणून सकाळ होण्याची वाट बघत तो बसून राहिला.

कॉलेजचे शिक्षण घेतले असते तर हाच रत्नाकर कुठल्याकुठे गेला असता. पण फक्त एका मुलीने नकार दिला म्हणून स्वत:चे आयुष्य दिशाहीन करून नशेच्या अधीन जाणाऱ्या, भटकणाऱ्या आजच्या तरूण पिढीचे दर्शन सानियांनी आपल्या 'चाफा' कथेतून घडवले आहे.

**११ ) दुहेरी :-**

'दुहेरी' ही एक वेगळीच कथा आहे. आतापर्यंत 'खिडक्या' कथासंग्रहात सानियांनी शहरी जीवनावर कथा लिहलेल्या आढळतात. पण यामध्ये जंगलात राहणाऱ्या आदिवासी लोकांची कथा सांगितली आहे.

कथेची नायिका पूर्वी शाळेत शिकवत होती. घरातील मामीच्या त्रासामुळे तिने लग्न करायचे ठरवले होते. पण लग्न म्हणजे एक प्रकारचा जुगारच तिला वाटत होता. शिक्षण, नोकरी, कष्ट यातच तिने दिवस वेचले होते. प्रेमा तिची मैत्रीण. तिनेच अजितचे स्थळ सुचवले. त्याची नोकरी लांबची, जंगलातील होती. ती सोडून द्यायला तो तयार नव्हता. ती मनात नसताना अजितला भेटायला तयार झाली. भेटल्यावर तिने त्याला स्पष्टपणे सांगितले की तिला घरातून सुटका हवी आहे. मामांच्या प्रतिष्ठेसाठी ती त्या घरात रहात होती. अजितची काही हरकत नव्हती. ती सगळ सोडून अजितकडे विश्वासाच्या बळावर जाणार होती.हीच खरी सुरवात होती.

पुढे लग्न झाल्यानंतर तिला काही महिने परीक्षा व नोकरी असल्याने तिकडेच रहायला लागले. ज्यावेळी ती अजितकडे जायला निघाली त्यावेळी पत्रातून त्याने तिला एकटीला यायला जमेल का? विचारले. तिला जाणवले हीच आपल्या धैर्याची सुरवात आहे. स्टेशनवर उतरल्यानंतर काही क्षण अनोळखी प्रदेशात लहान स्टेशनवर, अंधारात, थंडीत एकटेच उभे राहताना कसे वाटते याचा अनुभव आला. घरी जाताना तिला जंगलातून गेल्यासारखे वाटत होते. परकेपणा जाणवत होता. कालिदास हा तिथल्याच

जमातीतला मुलगा. त्याने एम.ए. केलेले होते. त्याला आपल्या लोकात मिसळायची लाज वाटत होती. त्याला शहरी लोकांबद्दल मात्र खूप आकर्षण होते. अजितशी मैत्री करण्याचे हेच कारण असावे असे तिला वाटले. तो सध्या डिस्ट्रीक्ट ऑफिसमध्ये क्लार्क होता. त्यासाठी त्याला वीस-तीस मैल जावे लागे. यासाठी त्याला चांगली नोकरी हवी होती. कालिदासने तिला पुस्तके आणून देण्याची, चांगली ठिकाणे दाखवण्याचे आश्वासन दिले.

ती खोलीत जाताच एक चौदा-पंधरा वर्षाची मुलगी 'रानू', दिसायला खूप चांगली, दागिन्यांनी मढलेली, डोळे मात्र वेधक अशी मुलगी तिची खोली आवरू लागली. तिची आई लशमी स्वयंपाक करीत होती. रानूला तिची भाषा बोलता येते हे बघून तिला खूप उत्साही वाटू लागले. एका निसर्गरम्य ठिकाणी गेल्यावर तिला जाणवले की काही दिवसापूर्वी अजितचे अस्तित्व देखील नव्हते. पण त्याच्या स्वभावात जी मृदुता होती, त्यामुळे तिला अजित आवडू लागला. अजितला दोन व्यक्तीत जो ताण येतो त्याचेच आश्चर्य वाटत होते. कारण प्रत्येकाच्या आत जी मृदुता, समज असते ती जाणीवपूर्वक वाढवली की नाती सहज, सोपी होतात. तिथेही ती शाळेत शिकवत होती. एकदा ती शाळेत गेली असताना पाऊस जो सुरू झाला ते थांबण्याचे चिन्हच दिसेना. असा पाऊस तिथे कित्येक दिवस चालायचा. गाव तर 'तळयातील टेकडीसारखं' दिसायचे. कालिदास तिला न्यायला आला होता. त्याने खोटेच सांगितले की, दोघे साईटवर कामावर गेले असताना अजितची जीप बंद पडली. तो घरी गेला आणि त्याने कालिदासला तिला आणायला पाठवले. तो तिला सांगू लागला की पावसाने आयुष्य लुटून नेऊ नये म्हणून त्यांच्या जातीत एक उत्सव असतो. तो जसा कॉलेजमध्ये जाऊ लागला तेव्हा चांगल्या गोष्टी पाहिल्या की, आपल आयुष्य फुकट आहे असे त्याला वाटे. तिच्यासारखे शहरातील लोक जर अशा ठिकाणी आले तर त्यांना संघर्ष करावा लागत नाही. इतर लोक त्यांच्याकडे मानाने बघतात. हेटाळणी मात्र कालिदाससारख्याची होते. कालिदासला तिच्यासारखी बायको हवी होती. अजितबरोबर राहून तो कितीतरी गोष्टी तो स्वत:साठी मिळवायला शिकला आहे असे म्हणाला. तिने त्याच्याकडे बघितले.त्याने एकाएकी गाडी थांबवली. तिने गाडी सुरू करायला सांगूनही कालिदासने गाडी सुरु केली नाही. त्याने काही करण्याअगोदर तिने त्याच्या चेहऱ्यावर प्रहार केला.

घरी आल्यावर तिने अजितला झालेला प्रकार सांगितला. त्यावेळी त्याला धक्का बसल्यासारखा झाला. या प्रसंगानंतर त्याच्या साईटवरचे वातावरण बदलले. लोक पिऊन यायचे, भांडायचे, कामे करीत नसत. पूर्वीसारखे त्याला वाटत नव्हते म्हणून त्याने परत जायचे ठरवले होते. पण ती रमली होती. अजित सुरवातीला ज्या काळातून गेला तोच काळ ती अनुभवत होती. एके दिवशी ती शाळेत जात असताना रानूच्या आईने शाळा बंद असल्याचे सांगितले. कारण तिथले लोक दंगा करणार होते. खर तर कालिदासचे वडील अजितवर राग धरुन होते. कारण त्याच्यासारखे शहरी लोक आपली जागा न ओळखता कालिदाससारख्या लोकांना आमिष दाखवून दूर पाठवून शिकवतात. लशमी तिला अजितची बदली करून घ्यायला सांगत होती. त्या दोघी  बोलत असताना कालिदास आला.

लशमीला माहीत होते की, त्याची नजर चांगली नाही. त्याने अजितवर हल्ला झाल्याचे सांगितले. लशमी जाऊ नको म्हणाली पण ती गेली. लशमी चढताना कालिदासने तिला ढकलले. एका शेडसमोर तिला सोडून 'पोलीसे मागावर आहेत' असे म्हणून निघून गेला. अजितला झोपवून ठेवले होते. तो हल्ला कालिदासनेच केला होता. पोलिसांनी कालिदासवर काही संशय आहे का? विचारल्यावर तिने नकार दिला. कारण तिच्या मनात आले या प्रसंगामूळे सगळयांनाच समजून घेणे अधिक सोपे  झाले होते.

खरोखर प्रत्येक जातीतील लोक एक असतात. बाहेरील कोणत्याही व्यक्तीला आपल्या जातीत समाविष्ट करुन घेत नाहीत. घेतले तर ते तात्पुरते असते. त्याचा काटा काढायला देखील मागेपुढे बघत नाहीत. हे सानियांनी आपल्या 'दुहेरी' या कथेतून सांगितले आहे.

**१२ ) खिडक्या :-**

'खिडक्या' कथासंग्रहातील 'खिडक्या' ही एक कथा. या कथेत पद्मनाभ नावाचा एक लेखक आहे. हृदयविकाराच्या झटक्याने त्याचा मृत्यू होतो. पण त्यामुळे त्याची मुलगी सुमा आणि बायको जयंती यांना काहीच फरक पडत नाही. सुमा सुट्टीला घरी आली असताना त्याचा मृत्यू झाला होता. सुमाला आई अंधूक आठवत असल्यामुळे तिला सतत वडिलांजवळ राहावेसे वाटे पण पद्मनाभने तिला दूर ठेवले होते.

सुमा जेव्हा पद्मनाभची पुस्तके वाचू लागली तेव्हा तो तिला अधिक जाणून घ्यावासा वाटू लागला. कदाचित त्यामधून एखादे मित्रत्वाचे नाते निर्माण झाले असते असे तिला वाटले. वडिलांचे जाण्याचं दु:ख होतेच. पण या सगळयातून पद्मनाभला जाणून घेण्याचा धागा सुटून गेला होता. सुमा त्याचे केलेले सर्व लिखाण घेऊन जाणार होती पण ते न्यायला प्रकाशक भास्कर आला होता.

पद्मनाभची मृत्यूची बातमी जेव्हा जयंतीने वर्तमानपत्रातून वाचली तेव्हा क्षणभर तिने डोळे मिटले. तिच्या पूर्वीच्या आठवणी जाग्या झाल्या. तिचे पूर्वीचे आयुष्य, पद्मनाभचे अकल्पित भेटणे, एकत्र राहण्याचा निर्णय, नंतर फक्त पोकळ अर्थ. ती परदेशी गेल्यानंतर त्याने तिला खूप पत्रे लिहली. पण तिने उत्तर पाठवलच नाही. ती सगळे सोडून निघून गेली. त्याचे प्रकाशित झालेले एकही पुस्तक वाचले नव्हते. पण शेवटपर्यंत त्याला तिच्याबद्दल आत्मीयता होती हे जेव्हा त्याच्या शेवटच्या लिखाणावरुन कळाले, तेव्हा त्याच्या मृत्यूने झालेले रिकामेपण तिला अधिकच जाणवत होते. माणसे लिहीताना खरी होतात हे तिला पटले होते.भास्कर सुमाला सांगत होता की, पद्मनाभ गेल्या काही दिवसात खूप भिकार लिहीत असे. त्यामुळे त्याने ते स्थगित करायचे ठरवले होते. पण अलीकडचे लिखाण चांगले असल्याने ते प्रकाशित करायचे ठरवले होते. या लिखाणात जयंतीची व्यक्तिरेखाच साकारली होती. जयंतीची प्रकाशनाला हरकत नव्हती. पण पद्मनाभच्या मृत्यूनंतर त्याचे काहीही प्रसिद्ध करु नये असे सुमा म्हणाली. भास्कर नाराज होता कारण त्याचा धंदा हुकला होता. पद्मनाभच्या सगळया वस्तूवर सुमाने हक्क सांगितला होता. जयंतीला वाटत होते की, ते दिवस पुन्हा यावेत. ज्यातून ती पद्मनाभला समजून घेण्याचा प्रयत्न करेल. दूर जाऊन जे हरवून बसली होती ते पुन्हा मिळवेल. यासाठीच सुमाला ते प्रसिद्ध करायचे नव्हते. ते लिखाण सुमा जाळणार होती. ती जयंतीला म्हणाली की, जेव्हा वडिलांना समजून घ्यावेसे वाटले तेव्हा ती जवळ असतानाच ते तिला कायमचे सोडून गेले. दोघांमध्ये भिंती वर्षानुवर्षे होत्या, पण निदान त्यांना दारे-खिडक्या तरी होत्या. ती उघडण्याची संधी पद्मनाभने सुमाला द्यायला हवी होती असे तिला वाटत होते. जयंतीला वाटले की, तिच्या ठिकाणी आपण असतो तर असेच वागलो असतो. असे म्हणून ती जाण्यासाठी उठली.

सानियांनी कथेतून माणसांना एकत्र राहून नातेसंबंध जपता येत नाहीत. दुरावा वाढल्यानंतर मात्र तेच जपावेसे वाटतात. पण त्याचा काही उपयोग नसतो कारण वेळ निघून गेलेली असते हे दाखवले आहे.

**१३ ) संदर्भ :-**

'संदर्भ' ही पहिल्या आवृत्तीमधील कथा आहे. माणूस कधी, कुणाच्या प्रेमात पडेल हे सांगता येत नाही. हेच खरे सानियांनी आपल्या संदर्भ या कथेतून दाखवून दिले आहे.

कावेरीची ओळख डॅनियलशी एका पार्टीत झाली होती. त्यावेळी तो पस्तीशीच्या आसपास होता. त्याने बायकोला घटस्फोट दिला होता. तिला व दहा-बारा वर्षाच्या मुलाला जर्मनीमध्ये सोडून तो तीन वर्षाच्या कराराने भारतात आला होता. कावेरी त्याच्यामध्ये गुंतून पडलेली होती. तिच्या घरच्यांना सगळी परिस्थिती माहीत झाल्यावर धक्काच बसला. तिला दुसऱ्यांपेक्षा स्वत:शी खूप झगडावे लागले होते. तिचा एकीकडे प्रेमावर विश्वास होता तर दुसरीकडे हे सगळे कुठे घेऊन जाणार याचा अंदाज नव्हता. ती ज्या ऑफिसमध्ये कामाला होती त्या ऑफिसमधील बॉस चक्रवर्ती, ललितचे वडील यांच्याशी तिची चांगली मैत्री होती. त्यांनी आपला मुलगा ललित याच्यासाठी तिला मागणी घातली होती. तो दोन वर्षाच्या मॅनेजमेंटच्या कोर्ससाठी अमेरिकेला गेला होता. ललित कोणत्याही मार्गाने पैसा मिळवत होता. भारतात असताना देखील त्याने पैशाची, कोर्टकचेऱ्यांची, मुलींची प्रकरणे केली होती. डॅनियलमुळे कावेरीचे नाव चर्चेत राहिले असले तरी ती ललितला संभाळून घेऊ शकेल असे त्यांना वाटत होते.

ललितची आणि तिची पहिल्यांदा भेट झाली त्यावेळी त्याने तिला नकार दिला होता, पण पुढे त्याला कावेरीशी लग्न करावेसे वाटत होते. कारण तो एके ठिकाणी स्थिर झाला असता असे त्याला वाटत होते. कावेरीने आयुष्यात खूप तडजोडी केल्या होत्या. मग ही तडजोड करायला काय हरकत होती? म्हणून ललित तिला पुन्हा पुन्हा लग्नाविषयी विचारत होता. पण ती काहीच उत्तर देत नव्हती. एकदा तर त्याने प्यायलेल्या अवस्थेत तिच्यावर हात देखील उगारला. त्याचा तोल गेला होता. कितीतरी वेळाने त्याने तिची माफी मागितली होती. ती या साध्या घटनेने रडणारी मुलगी नव्हती. ती फक्त एकदा रडली होती. डॅनियल जायच्या दिवशी. कावेरीला आयुष्याचा एक तुकडाच निघून पडल्याची जाणीव

झाली होती. दोघांनाही खूप वाईट वाटत होते. डॅनियल तिला परदेशी घेऊन गेला असता तर कुणीच दु:खी राहिले नसते. पण कित्येक गोष्टींचे संदर्भ बदलले की, नंतर त्या गोष्टीचे काहीच मूल्य रहात नाही. कावेरीच्या घरच्यांनीदेखील तिला जायची परवानगी दिली नसती आणि तिला एकटीलाच परत यायला लागले असते, तर आयुष्याचाच खेळ झाला असता. त्यापेक्षा आयुष्याची दारे तिने स्वत:नेच बंद करून टाकली होती. ललितशी लग्न केल्यानंतर तिला काही समस्येतून जावे लागणार, ते अटळ आहे याची तिला जाणीव झाली.

'विवाह' या पारंपारिक विधीला छेद देणारी अशी ही कावेरीची कथा आहे. येईल त्या संकटाला तोंड देऊन खंबीरपणे उभी राहून आपले म्हणणे खरी करणारी अशी ही नायिका आहे.

**१४ ) स्वाध्याय :-**

आयुष्यात स्वत:च्या बळावर सर्व काही मिळवलेली अशी ही पद्मिनी या स्त्रीची 'स्वाध्याय' ही कथा आहे. ती कामानिमित्ताने आडगावी रेस्ट हाऊसमध्ये राहते. नाना तिचे वडील. त्यांनी तिला 'चिरंजीव पद्मिनीश्वरीस प्रणाम' असे उपहासाने पत्रात लिहले होते. त्यांनीच कळवले होते की, तिचा नवरा विश्रामराव यांच्या विनंतीला मान देऊन हे पत्र लिहीत आहे. तिला वाटत होते की नाना समोरच हात जोडून नाटकीपणाने संवाद म्हणत आहेत. ते शाळा मास्तर होते.

ऑफिसमध्ये तिचा दरारा होता. तिच्या वागणुकीमुळे सगळेच तिच्याशी अंतर राखून होते. त्यामुळे भलतं-सलतं कुणी वागण्याचा प्रश्नच नव्हता. वयाने आणि अधिकाराने लहान असणारा सुमंत तिच्याबरोबर असतो. त्याचे वडील राजकारणात मुरब्बी होते. फोन आल्याचे त्यानेच सांगितले होते. तिला वाटले कदाचित नानांचा फोन असेल. पद्मिनी विश्रामला पत्र लिहणार होती. पण तिला माहीत होते की, पिण्यात अखंड बुडाल्यामुळे त्याच्या डोक्यात काहीच शिरले नसते. पद्मिनीने विश्रामबरोबर तीन वर्षे संसार केला होता. तो चांगला यशस्वी वकील होता. त्यावेळी पद्मिनी तिचे करिअर चांगल्या प्रकारे घडवित होती. पुढे सगळच बिनसले. पद्मिनी पुष्कळ पुढे आली. विश्राम मागेच राहिला. तिचा वेग त्याच्यापेक्षा जास्त होता. त्याला तिच्याबरोबर करिअर करणे जमले

नाही. पुढे विश्राम बदलला. ओळीने केसेस हरला. पैसे अपुरे पडले. दारुचे व्यसन लागले आणि नानांनी त्याला अलगत साथ दिली. नाना नसते तर ते कदाचित एकत्र राहिले असते. कदाचित त्यांच्यात कर्तव्यापोटी प्रेम, जिव्हाळा निर्माण झाला असता. पण नानांनी तसे होऊ दिले नाही. पद्मिनी एकटी पण यशस्वीरीत्या बाहेर पडली.

पुढे नानांनी तिला ओळीने चार पत्रे लिहली. विश्राम एकटा आहे. तो तिची वाट बघतो आहे. फोनवरून तिला कळले की विश्राम अतिशय आजारी आहे आणि तिची आठवण काढत आहे. रात्रीचे साडेअकरा वाजून गेले होते. त्यावेळी तिला कोणतीच गाडी मिळणार नव्हती. ती एकटीच जायला निघाली. तिच्या मनात आले ती पोहोचेपर्यंत विश्राम राहणार होता का? सुमितला ती नको म्हणत असताना तो तिच्याबरोबर जायला निघाला. खूप वेळाने तिला बस मिळाली. पण ती खाजगी होती. तिने ड्रायव्हरला—कंडक्टरला विनंती करून बसमध्ये घ्यायला सांगितले. पण बसमध्ये अगोदरच गर्दी होती. सुमित कंडक्टरबरोबर हुज्जत घालत होता. सुमितने शेवटी सांगितले की, तिचा नवरा खूप आजारी आहे. शेवटची भेट होईल न होईल हे देखील सांगता येत नाही. त्याक्षणी सगळयांचेच मन पालटले. सुमितचे पद्मिनीला आश्चर्य वाटत होते. बसमध्ये तिच्यापाठोपाठ तो कधी चढला हे तिला कळालेच नाही. आपण विश्रामची भेट घेण्याची संधीतरी निदान घेतली असे तिला वाटते.ती पोहोचली तेव्हा पहाट झाली होती. रिक्षा,टांगे नव्हते म्हणून ती चालू लागली. हॉस्पिटलमध्ये गेली तर नाना खांदे पाडून बसले होते. नानांनी तिला आता येते आहेस? विचारले. विश्राम जग सोडून गेला होता. ती बाकावर बसली. शेजारी सुमित उभा होता. सुमित नसता तर नानांनी तिच्यावर हातचं उगारला असता. नानांनी त्याला मरेपर्यंत साथ दिली होती. विश्रामने शेवटच्या श्वासापर्यंत पद्मिनीची आठवण काढली होती. पण ती आली नव्हती. नानांनी ती अशीच मरेल असा शाप दिला. त्यांनी सुमितचा उल्लेख 'पद्मिनाचा यार' म्हणून केला. ती देखील हो म्हणली. तिला कळेना की आता एक वेगळा स्वाध्याय सुरु झालेला आहे, की संपलेला आहे? ती आत जाण्यासाठी वळली. सुमित बावरुन तिथेच थांबतो म्हणाला. सुमितचा तिने फायदा करुन घेतला होता. जसा नानांनी आणि विश्रामने करुन घेतला होता. तिने परतीच्या प्रवासात सुमितला सगळे तपशील सांगायचे ठरवले.

स्त्रीच्या स्वत:च्या मनातील व समाजातील स्थान, परस्पर विरोधी भूमिका पार पाडताना तिच्यावर येणारे दबाव, त्यातून तिची होणारी कोंडी व अखेरीस मनात भरून राहणारी अगतिकता पद्मिनीच्या रुपाने 'स्वाध्याय' ही कथा सानियांनी चित्रित केली आहे.

अशा प्रकारे सानियांनी 'खिडक्या' या कथासंग्रहातील सर्व कथा समरसून लिहलेल्या आहेत. स्त्रियांचे दु:ख किती वेगवेगळया प्रकारचे असते हे आपल्या सर्व कथांतून दाखवले आहे.

आता आपण 'खिडक्या' कथासंग्रहाचे विशेष पाहणार आहोत.

**१ ) मुखपृष्ठ :-**

'खिडक्या' या कथासंग्रहाचे मुखपृष्ठ मनोज आचार्य यांनी तयार केले आहे. मुख - पृष्ठावर एका स्त्रीचे चित्र आहे. ते चित्र साध्या भोळया स्त्रीचे चित्र नाही, ही स्त्री आधुनिक स्त्री आहे. तिचा पेहराव असा आहे की ती जणू सांगते आहे की या गुलामगिरीतून आम्ही मुक्त आहोत. 'खिडक्या' शीर्षक म्हणजे या मानवी मनांच्या, भावनांच्या खिडक्या आहेत. ज्यातून एकमेकींना, एकमेकींची दु:खे कळू शकतील. अतिशय समर्पक शीर्षक दिले आहे.आपल्या मनाच्या खिडक्या कितीही बंद केल्या तरी कुठून ना कुठून तरी, झरोक्यातून का होईना पण सर्वांच्या आयुष्यात दुःख,संकटे,संघर्ष हे येतच असतात. हे सानियांनी 'खिडक्या' या कथासंग्रहातून सांगितले आहे.या कथा वाचल्यानंतर या मनाच्या खिडक्या किती विविधरंगी असतात ते दिसून येते.

**२ ) स्वगत प्रकारच्या कथा :-**

स्वगत म्हणते जणू काय ती कथा आपणच आपल्याला सांगत आहोत. आपल्या आयुष्यातील दु:ख आपण आपल्या एखाद्या जिव्हाळयाच्या मैत्रिणीला सांगत आहोत. अशी कल्पना करुन प्रथमपुरूषी निवेदन पद्धतींचा वापर केला आहे. जसे नाटकात भूमिका करताना त्या भूमिकेत शिरावे लागते अगदी तसे सानियांच्या कथेत दिसून येते. 'शिल्लक' आणि 'दुहेरी' या कथा स्वगत प्रकारच्या आहेत.

**३ ) 'खिडक्या' कथासंग्रहातील स्त्रीचित्रण :-**

'खिडक्या' कथासंग्रहातील सर्वच कथा स्त्री केंद्रबिंदू असणाऱ्या कथा आहेत. दोन घटका मनोरंजन हा हेतू न धरता स्त्रियांच्या मानसिक समस्येला प्राधान्य देऊन सानियांनी

लेखन केलेले आहे. भावनिक आंदोलने, मानसिक यातना, शारिरीक कोंडी या सर्व समस्या चित्रित करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. कालिंदी, अश्विनी, किशोरी, मिनू, कस्तुरी, नंदिता, मोनिका, साधना, सुमा, जयंती, कावेरी, पद्मिनी अशा कितीतरी दु:खी स्त्रियांचे चित्रण त्यांच्या कथेमधून घडते.

'एकदा जाग आली' कथेतील कालिंदी आपल्या अंगात असणारी कलेची धग कायमची विझली आहे म्हणून अस्वस्थ झालेली आहे. हे एका स्त्री कलाकारचे दु:ख आहे. तिने ती केलेची धग परत जागवण्याचा प्रयत्न केला पण ती केवळ स्वप्न ठरली म्हणून ती दु:खी होते. इतर स्त्रियांपेक्षा कालिंदीचे दु:ख हे वेगळया प्रकारचे दु:ख असलेले दिसून येते.

'वय' कथेतील अश्विनी अगदी कुमार अवस्थेतील, कॉलेजमध्ये जाणारी आणि नकळत कुमारच्या प्रेमात पडलेली. पण ते प्रेम त्याच्यासमोर व्यक्त करता आले नाही म्हणून रडणारी अश्विनी चित्रित केली आहे. अल्लड वय म्हणतात ते हेच. या वयात मन कधी कुणावर जडेल ते सांगता येत नाही. तशीच अवस्था अश्विनीची झालेली दिसते. कथेला योग्य शीर्षक दिले आहे.

तर 'स्त्रोत' कथेतील किशोरी उत्कट प्रेम चारुहासवर करायची आणि किशोरीवर केदार करायचा. पण शेवटी वडिलांच्या घराला लाथाडून,केदारचे प्रेम नाकारुन, चारुहासबरोबर लग्न करणारी किशोरी तरीही अस्वस्थ आहे. कुठेतरी ती हरवून गेली आहे. ती आतल्या आत मिटून गेली आहे म्हणून दु:खी आहे.

'वाटा' कथेत आधुनिक कमावत्या स्त्रीचे-मिनूचे चित्रण केले आहे. आपला हक्क आपल्याला मिळावा अशी तिची अपेक्षा आहे. तिला वाटते आपला नवरा आपल्याकडे दुर्लक्ष करीत आहे. पण खरं तर तो तिच्यावर खूप प्रेम करत असतो. त्याला शिक्षा देण्यासाठी ती तिच्या मित्राबरोबर एक रात्र घालवते.ही गोष्ट जेव्हा तिच्या नवऱ्याला-अनिरुद्धला कळते तेव्हा तो रागवतो. पण अजून काही नवीन गोष्टी जाणून घेण्याची संधी देतो. शेवटी मिनूला तिची चूक कळते.

'शिल्लक' कथेतील कस्तुरी जेव्हा आजारी पडते आणि कायमची निघून जाते.तेव्हा पश्चातापाने दग्ध झालेली 'ती' चे वर्णन सानियांनी केलेले आहे. कस्तुरी आजारी असताना

आपण तिच्याशी खूप वाईट वागलो याचा तिला पश्चाताप होतो.आपल्या अशा वाईट वागण्यानेच कस्तूरी कायमची निघून गेली म्हणून ती रडत बसते.

'प्रारंभी खेळाच्या' कथेत नंदिताची व्यथा सानियांनी सांगितली आहे. आपले वडील आपल्या बहिणीसारखे एखाद्या न शोभणाऱ्या माणसाशी आपले लग्न करुन टाकतील म्हणून शिक्षण अर्धवट सोडून मैत्रिणीच्या ओळखीच्या नातेवाईकाशी लग्न करते. पण तो दोन वर्षात मरण पावतो. म्हणून ती टाईपरायटरची नोकरी करते. तिची ओळख किरणशी होते. तो लेखक असतो. पण तो आभासमय जीवन जगत असतो. जेव्हा त्याला नंदिताची कथा समजते तेव्हा तो तिच्यासारखे संथ, सरळ आयुष्य जगाायचे ठरवतो. नकळत नंदिता त्याच्या प्रेमात पडलेली असते. पण किरण तर तिच्यापासून दूर जाणार होता. नियती तिच्याशी अशी दुहेरी खेळ खेळली होती. यातून नंदिताच्या मनाची दुहेरी स्थिती दिसून येते.

'पावसाळयातली गोष्ट' मधील मोनिका श्रीमंत घराण्यातील असते. ती विद्याधरशी लग्न करते. तो लेखक असून कनिष्ठ वर्गातील असतो. त्याने लग्नआधी मोनिकाला परिस्थितीची कल्पना दिलेली असते. तरीही तिचा हट्ट ढळत नाही. पण ज्यावेळी ती संसार करु लागते त्यावेळी मात्र तिचा धीर सुटत जातो. त्यात तिला दिवस जातात. पण तिला ते नको असते. तिला वाटते की इतके दिवस तरून जाण्याची क्षमता होती, ती कुठे गेली? म्हणून ती दु:खी आहे.

'दुसरं घर' मधील साधनाला आपल्या वडिलांनी दुसर लग्न केले, पण त्या काळात आपण काय करत होतो? आपण आपल्या आईला वेडी म्हणालो. पण आपणच खुळया ठरलो याची जाणीव तिला होते. वडिलांविषयी तिच्या मनात प्रेम आहे. म्हणून ती प्रत्येक महिन्याला त्याची वाट बघत असे. कॉलेजमधील सर्व हकीकत त्यांना सांगायची. पण वडिलांच्या या घटनेने तिच्या किशोरवयीन मनाला धक्का पोहोचतो.

'दुहेरी' या कथेत 'मी' चे चित्रण केले आहे. प्रथमपुरुषी एकवचनी निवेदन आहे. तिचे आपल्या नवऱ्यावर प्रेम आहे. विश्वासाची हीच सुरुवात आहे म्हणूनच ती शहर सोडून एका छोटयाश्या गावी त्याच्यावरच्या विश्वासाच्या बळावर जाते.

'खिडक्या' कथेतून दोन स्त्रियांची चित्रणे आली आहेत. सुमा आणि जयंती. आई-मुलगी यांचे नाते स्पष्ट करणारी कथा आहे. आपल्या वडिलांना आपण पुरेसे जाणू शकलो नाही. ते जिवंत असताना तिला त्यांची जवळीक, प्रेम, आपुलकी कधी मिळालीच नाही. त्यांच्यात एक भिंत होती, पण त्याला खिडक्या तरी होत्या. पण वडील वारल्यामुळे आता त्या कायमच्या बंद झाल्या होत्या. जयंती आपल्या मुलीला पद्मनाभजवळ ठेवून कायमची दूर गेली होती. त्यामुळे तिच्याबद्दल तिरस्कार देखील सुमाच्या मनात होता. अशा प्रकारे आई, मुलगी, वडील या तिघांचे चित्रण या कथेत आले आहे.

'संदर्भ' कथेत कावेरीचे चित्रण आले आहे. ती लग्नाअगोदरच डॅनियलबरोबर संबंध ठेवते. डॅनियलला मुलगा, बायको असते. तो तीन वर्षांच्या कराराने भारतात आलेला असतो. भारतात त्याचेही प्रेम कावेरीवर बसते. पण तिला घेऊन जाणे शक्य नसते. तो निघून जाताना कावेरी खूप रडते. अशी ही प्रेमवेडया कावेरीची कथा आहे.

'स्वाध्याय' कथेत स्वकर्तृत्वावर मोठया झालेल्या पद्मिनीचे चित्रण आले आहे. तिच्या वेगाबरोबर तिचा नवरा विश्राम याला जाता आले नाही. त्यामूळे दारुमध्ये आपले आयुष्य संपवून टाकतो. पद्मिनीचे वडील नाना त्याला मदत करतात. त्यांचा पद्मिनीवर पहिल्यापासून राग होता. ती कामानिमित्त आडगावी गेल्यानंतर तिला विश्राम गेल्याचा फोन येतो. त्यावेळी नको म्हणताना सुमित तिच्याबरोबर हॉस्पिटलपर्यंत येतो. पण त्याचा उल्लेख नाना पद्मिनीचा 'यार' म्हणून करतात. नाना तिचे वडील असून तिचा द्वेष करीत. अशा प्रकारे पद्मिनीच्या मनात नसूनही ती विश्राामच्या मृत्यूला सामोरे गेली होती.

**१ )हळवी व उत्कट नायिका :-**

स्त्री मुळात हळवी असते पण तिला दुबळी ठरवली जाते. त्यांची मानसिक, भावनिक आंदोलने सानियांनी आपल्या कथेत टिपलेली आहे. या नायिकांना त्यांचा भूतकाळ आहे.

तारुण्यातील अटळ परिस्थितीचे गाफील क्षण आहेत. त्यामध्ये भूतकालीन विश्व धूसरपणे दिसते. जवळपास प्रत्येक नायिकेला भूतकाळ आहे. उदा. किशोरी-केदार(स्त्रोत), कालिंदी-वसू (एकदा जाग आली). या सर्वांना कोणे एके काळी त्यांच्या तारुण्यात परस्पराबरोबर रहावे, जवळ यावे, सुखदु:खात सहभागी व्हावे असे वाटते. पण

ते टिकत नाही. इतकेच नव्हे तर एकेकाळचे हे मित्र बऱ्याच वर्षानंतर पुन्हा आयुष्यात आले तरी या नायिकांना नेमके कसे वागावे हे कळत नाही. "...खूप काही आठवतय रे जुनं. एकदमच सुचेनासे झालं आहे ..... सगळंच ......सर, केदार, ही वेळ... काही समजत नाही, काय करावं..... पूर्वीसारख एकत्र जमलोच आहोत तर.....तिला समजेना." (पृ. ५२, स्त्रोत) या नायिकांचे नेहमी असे होते.[२]

वसू वेलणकरच्या येण्याने जशी कालिंदी सुखावते. तशी तो जाण्याने दुखावते देखील. 'वय' कथेतील कुमारवरच्या प्रेमामुळेच तो कायमचा निघून जाणार या कल्पनेमुळेच ती रडू लागते. 'स्त्रोत' मधील किशोरी केदारच्या कविता वाचून रडली होती. खूप हळवी बनली होती. 'शिल्लक मधील 'मी' ला आपल्या मैत्रिणीच्या मरणाचे खूप दु:ख होते. 'दुसरं घर' मधील साधनाला आपल्या वडिलांनी दुसरे घर का केले हा विचार करुन खूप रडायला येते. अशा प्रकारे सानियांनी विविध स्त्रियांचे प्रश्न, त्यांची दु:खे आपल्या कथेतून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**२ )एकटेपणा स्विकारणाऱ्या नायिका :-**

"स्वत:ची घडण स्वत: करणाऱ्या त्यासाठी कोणाचाही आधार न घेणाऱ्या, जवळिकीतही अंतर राखून असणाऱ्या नायिकांशी सानिया जास्त समरस होतात. या कणखरपणासाठी आवश्यक असणारे आर्थिक बळ त्यांनी कमावलेले असते. त्या हुशार, महत्वाकांक्षी, नोकऱ्यात वरच्या जागा पटकवलेल्या असतात. परिस्थितीच्या रेटयामुळे बाहयव्यवस्थेची मूल्ये जरी त्यांना व्यवहारात स्विकारावी लागली तरी ती व्यक्तिगत किंवा खाजगी जीवनात त्या नाकारतात. या नकाराचा वेगळा 'स्व' जिवंत ठेवण्याचा एक मार्गच त्यांना एकटे राहण्यातून सापडतो. ज्या नात्यात दमनाची शक्यता असते ती नातीच त्या टाळतात. भक्कम व मुक्त एकटेपणा असताना स्वत्वाचा निर्भर अविष्कार होण्याच्या शक्यता जास्त. त्यामुळे अशा एकटेपणाची निवड या नायिका बहुतेक वेळा करताना दिसतात. 'वाटा' या कथेतील घटस्फोटित सरोजिनी म्हणते, "खरं म्हणजे मी काही नवऱ्याला सोडल्याचा पश्चाताप करते आहे असं नाही. नालायक होता तो! पण तरी वाटतं की दुसऱ्याला वेळीच सावध करावं. एकदम निर्णयाला येऊ नये. कारण, पर्याय कुठेतरी असतीलही.ते मोठेसे सुखाचे नसतात. पण तरीही काहीही म्हण मिनू, आपण शेवटी

एकटेच असतो. समजून घेणं म्हणजे तरी काय, त्यालाहा मर्यादा असतातच." (वाटा- पृ.क्र. ६८)

म्हणजे शहाणपण, समजदारी, स्वयंपूर्णता व सामर्थ्य एकटेपणातून येतं असा या नायिकांना विश्वास आहे. स्वातंत्र्याची किंवा मुक्तीची ही कल्पना वैराग्याकडे झुकलेली म्हणून अपुरी वाटते. काही ठिकाणी हा एकाकीपणा नाईलाज म्हणून पत्करलेला केविलवाणा वाटतो. मग त्या आपले आयुष्य तसेच रेटत राहतात. 'संदर्भ' या कथेतील कावेरी प्रेमसंबंधातील पुढचे टप्पे घसरणीचे आहेत म्हणून गृहीत धरते आणि बंद करुन टाकते. 'शिल्लक' या कथेतून देखील त्यामुळे काहीही निर्माण होत नाही. आपले मार्ग आपण शोधण्यातले उसने समाधान मिरवणारा हा एकटेपणा समर्थ तर वाटत नाहीच, उलट वांझ ठरतो. या माणसांना एकटेपणाची चटक लागली असल्यामुळे ती निर्णय घेण्याचे टाळताहेत असे वाटत राहते."[३]

**३ ) नायिकांचा लग्नानंतरचा प्रवास : -**

"कोणत्याही स्त्रीला लग्नोत्तर काळामध्ये सांभाळावी लागणारी आणि तिच्या मनस्तापास कदाचित सर्वाधिक कारणीभूत ठरणारी नणंद, सासू, दीर ही सासरची नाती मात्र या चित्रणात कधीच येत नाहीत. (अपवाद 'वाटा' आणि 'प्रारंभी खेळाच्या' मधील काही भाग) प्रेम अणि लग्नसंबंधातील आदर्शवादी स्वप्नाळूपणात ती बसलीच नसती. बायकोला जाच करणे, बटबटीत पद्धतीने छळणे, तिच्यावर वर्चस्व गाजवणे असे पुरुषप्रधानतेचे किंवा स्त्रीदास्यत्वाचे ढोबळ अविष्कार येथे दिसत नाहीत. हे खरे असले तरी बारकाईने बघितले तर स्त्रीचे दुय्यम स्थान, दुबळे व्यक्तिमत्व, तिचे मानसिक परावलंबन व चाकोरीबद्ध भूमिका पार पाडण्यासाठी तिच्यावर येणारा स्वत:चा व नवऱ्याचा दबाव लक्षात यायला वेळ लागत नाही. म्हणजे घरचे पाहून ऐनवेळी जास्त लोक येऊन तिला होणारे श्रम, नवऱ्याच्या बरोबरीने पैसा कमवून तो पुरवायचा देखील... या समजुतीला छेद देणारी आणि स्त्रीवादी समीक्षा दृष्टीकोनातून अर्थपूर्ण ठरणारी उत्तम कथा म्हणजे 'स्वाध्याय'. स्त्रीचे स्वत:च्या मनातील व समाजातील स्थान, परस्परविरोधी भूमिका पार पाडताना तिच्यावर येणारे दबाव, त्यातून तिची होणारी कोंडी व अखेरीस मनात भरुन राहणारी अगतिकता. ही कथा परिणामकारकपणे प्रगट करते."[४]


15404

सानियांच्या कथेतील नायिका नवऱ्याची दासी होण्याचे नाकारतात. त्या प्रसंगी त्यांना उलट उत्तरे करतात, भांडतात देखील. ('वाटा' आणि 'पावसाळयातील गोष्ट' मधील काही प्रसंग) त्यामुळे त्यांच्या विचारात देखील फरक पडतो. प्रसंगी नायिका नवऱ्याला धडा शिकवण्यासाठी वाकडे पाऊल देखील टाकते. उदा. 'वाटा' मध्ये अनिरुद्ध आणि मिनूत इतका दुरावा येतो की त्याला न सांगता कामत या तिच्या ऑफिसमधील सहकाऱ्याबरोबर रात्र काढते आणि शेवटी अनिरुद्धच्या वक्तव्याने तिला पश्चाताप होतो. 'पावसाळयातील गोष्ट' मध्ये मोनिकाला मूल नको असते, पण जेव्हा तिचा नवरा विद्याधर हे चूकीचे आहे हे पटवून सांगतो तेव्हा तिला हसू येते. या कथेतील शेवटदेखील पाहण्यासारखा आहे.

अशा प्रकारे सर्व स्तरातील स्त्रियांची दु:खे सानिया आपल्या 'खिडक्या' या कथासंग्रहातून मांडताना दिसतात. स्त्रियांच्या दु:खाचे विविध पदर त्यांनी सहजपणे उलगडून दाखवले आहेत. त्याचप्रकारे त्यांनी स्त्रियांच्या दु:खाबरोबरच पुरुषप्रधान कथा देखील लिहिलेल्या आहेत. पण अशा कथांची संख्या जास्त नाही. 'स्वत्वाचा' ध्यास असणाऱ्या नायिका तन्मयतेने सानियांनी रंगवलेल्या आहेत. ही एकप्रकारे त्यांच्या कथांची मर्यादा वाटते पण तेच त्यांचे वैशिष्ट्य आहे.

**४ )'खिडक्या' कथासंग्रहामधील पुरुषचित्रण :-**

सानियांच्या कथालेखनात स्त्रियांच्या दु:खाबरोबर पुरुषांचे चित्रणही अगदी सहजतेने आलेले आहे. "त्यांच्या कथेतील सगळीच माणसे कमालीची बुद्धिमान आणि संवेदनक्षम आहेत. काहीजण साहित्याचे प्राध्यापक आहेत तर काहीजण साक्षात लेखकच आहेत. नवऱ्याची भूमिका ते प्रामाणिकपणे बजावतात. ते फार सोशिक असतात. बायकोचे मित्र घरी मुक्कामाला आलेले खपवून घेणारे असतात."[५]

असाच स्वभाव 'एकदा जाग आली' मधील अभयचा आहे. त्याला कालिंदीच्या कलात्मक जाणीव-नेणिव वगैरे त्याला चांगली कदर होती. आणि कालिंदीला ही अभयशी लग्न केल्यामुळे कधी उपासमार म्हणजे कलात्मक वगैरे झाल्याची जाणीव होत नव्हती. वसू वेलणकर, कालिंदीचा मित्र एकदम बेफिकीर स्वत:तील कलेची ठिणगी पेटती ठेवणारा. ती धग त्याला कालिंदीत दिसली नाही. त्याच्या म्हणण्याप्रमाणे कालिंदी शोध

घेण्याचा प्रयत्न करते. पण तिला ते जमत नाही. त्याच्या अंगी खरी कला होती. त्याने एक दोन शोज केले असते तर तो चांगलाच नावारुपाला आला असता. पण वसू ते सगळे सोडून एका कंपनीत नोकरी करु लागला. शेवटी त्याने स्वत:च कलेची धग नाकारुन नको ते आयुष्य स्वीकारले होते.

'वय' कथेतील कुमारचे आणि दीप्तीचे लग्न ठरलेले असते. पण दीप्तीचे मकरंद नावाच्या मुलावर प्रेम असते. हे दीप्ती त्याला पत्राने कळवते, तेव्हा मोठया मनाने तिच्या घरच्यांना सांगून तिचे लग्न मकरंदशी लावून द्यायला सांगतात. या ठिकाणी कुमारचा समजूतदारपणा दिसून येतो.

'स्त्रोत' कथेमध्ये भगतसर, चारुहास, केदार यांची चित्रणे आली आहेत. भगत सरांनी किशोरीला आपली मुलगी मानलेली असते. ते कॉलेजमध्ये शिकवण्याचे काम करीत असतात. पण कॉलेजच्या कर्मठ विद्यापीठाच्या निर्णयामुळे त्यांची नोकरी जाते कारण ते ब्राम्हण नव्हते. त्यासाठी ते किशोरीकडे येतात. किशोर आणि चारुहासचा प्रेमविवाह झालेला असतो. सरच त्याला पाठिंबा देतात. चारुहास हा राजकारणामध्ये असतो. सरांना वाटत असते की चारुहास आपल्या साप्ताहिकामधून यावर काहीतरी आवाज उठवेल. त्या दोघांची भेट होऊन देखील सरांच्या हाती काहीच लागत नाही. कॉलेजमध्ये असताना किशोरीला ज्याप्रकारे चारुहासबद्दल प्रेम वाटत होते अगदी त्याचप्रकारे उत्कट प्रेम केदारला किशोरीबद्दल वाटत असते. पण ती जाणुनबुजून दुर्लक्ष करत असते. ज्यावेळी त्या दोघांचे लग्न झाले त्यावेळी केदारच्या हातून काही भलते-सलते घडले असते, पण सरांनीच त्याला वाचवले होते. तो सगळे सोडून नवी दिशा शोधण्यासाठी निघून जातो. आणि अचानक त्याला चारुहास भेटतो. किशोरीच्या घरी आल्यावर तो सगळे तिला सांगतो, सरांपाठोपाठ तोही निघून जातो. किशोरीला वाटते की, ज्याप्रकारे त्याला अनुभव आला अगदी तसाच अनुभव तिला आला होता. सानियांनी यातून थोडा फार राजकारणाचा भाग दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

'वाटा' मधील अनिरुद्धला आपल्या फॅक्टरीमुळे बायकोला-मिनूला वेळ देता येत नसतो. पण मिनू याचा वेगळा अर्थ घेते. त्याला धडा शिकवण्यासाठी ऑफिसमधील कामत नावाच्या मित्राबरोबर एक रात्र घालवते. हे ऐकल्यावर तो खूप रागवतो. त्याने

दिलेल्या स्वातंत्र्याचा तिने गैरफायदा घेतलेला असतो. तिला दिवस गेलेले अनिरुद्धला माहीत असते. शेवटी ती त्याला पश्चाताप झाल्याचा सांगते. तेव्हा तो तिला समजावतो. अजून कितीतरी गोष्टी समजावून घेण्याची संधी अनिरुद्धने आपल्याला दिलेली आहे. याची तिला जाणीव होते. अनिरुद्धसारखा नवरा फारच कमी जणींच्या नशिबात असतो. या ठिकाणी दुसरा कोणी जरी असता तर मिनूला घराबाहेर काढले असते.

'हिवाळयातील पहिला दिवस' मध्ये शिस्तीत आयुष्य घालविलेल्या प्राध्यापक बर्वे यांचे चित्रण आलेले दिसून येते. बर्वे कॉलेजमध्ये लॉजीक शिकवत होते. कॉलेजमध्ये त्यांचा खूप दरारा असतो. पण हिवाळयाच्या पहिल्या दिवसात त्यांना जाणीव होते की आपल्या हातून कितीतरी गोष्टी करायच्या राहून गेल्या आहेत. त्यांना हा सगळा रेखलेला मार्ग फेकून द्यावासा वाटत होता. उभं आयुष्य सरत येत असल्याची जाणीव त्यांना झाली.

'शिल्लक' मधील 'ती' च्या मित्रावर-संतोषवर एकतर्फी प्रेम असते. पण ती त्याला सांगत नाही. शेवटी त्याची एंगेजमेंट होते. त्याच वेळी तिची मैत्रीण कस्तुरी खूप सिरीयस असते. कस्तुरीला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केल्यानंतर तिच्या मनाचा बांध कोसळतो. ती संतोषला सांगून टाकते की, तिचे त्याच्यावर प्रेम आहे. पण त्याला खूप उशीर झालेला असतो.कस्तुरी मरण पावते. त्यावेळी तो तिला म्हणतो की, कधी कधी आपल्याला काहीच वाचवता येत नाही.

'प्रारंभी खेळाच्या' मधील किरण एक लेखक असतो. वाचकांच्या पत्रव्यवहारातून नंदिताची व त्याची ओळख होते. तो जगत असतो ते भाबडे,स्वप्नमय जग असते. नंदिताचा नवरा वारल्यापासून ती एकदम संथ आयुष्य जगत असते. तिचे वागणे बघून किरण संथ, सरळ आयुष्य जगायचे ठरवतो. नंदिताला जाणवते की, दोघांचा वेग निरनिराळा आहे. पण किरण तिला म्हणतो की, ती जर तिच्या नवऱ्याच्या मृत्यूपासून निरोप घ्यायला शिकली आहे, तर किरणसारख्या एका व्यक्तीकडून निरोप घ्यायचा तिला काही अवघड नव्हते. अशा प्रकारे नियतीने किरणचा आणि नंदिताचा डाव मांडण्याअगोदरच उधळला होता.

'पावसाळयातली गोष्ट' मध्ये विद्याधर हा तत्वज्ञानी लेखक असतो. मोनिकाने स्वत:च त्याला लग्न करशील का? म्हणून विचारले होते. मोनिका श्रीमंत घरातील, तर

विद्याधर मध्यम वर्गातील होता. लग्न झाल्यावर तिला पैशाची अडचण खूप जाणवत होती. विद्याधरला तिची अस्वस्थता कळत होती. पण तो बोलून दाखवत नव्हता. तिला दिवस गेल्यावर ते मूल नको असते. कारण तिला वाटत असते की आहे त्या परिस्थितीत मूल झेपणार नाही. पण तो तिला समजावतो की, ही परिस्थिती काही दिवसांनी बदलेल. त्या दोघांच्या भूमिकांची अदलाबदल होईल. ती ज्या उजळ बाजू आहेत त्या बघायच्या सोडते. अशा प्रकारे तिची समजूत घातल्यावर ते तिला पटते. येथे विद्याधरचा समजूतदारपणा आणि दुरदर्शीपणा दिसून येतो.

'दुसरं घर' मधील साधनाच्या वडिलांचे पहिले लग्न होऊन सुद्धा त्यांनी दुसरे लग्न केलेले असते. हे जेव्हा साधनाला कळते तेव्हा तिला खूप वाईट वाटते. आपल्या वडिलांनी असे का केले? असे जेव्हा ती वडिलांना विचारते, तेव्हा ते तिला दुसऱ्या घरी घेऊन जातात. मुक्ता नावाची जी बाई होती तिला आधार देण्यासाठी त्यांनी तिच्याशी लग्न केले होते. आजपर्यंत साधनाला दादांची एक बाजू माहीत होती पण आज तिला त्यांची दुसरी बाजू कळाली होती.

'चाफा' कथेतून सानियांनी रत्नाकरच्या रुपाने आजच्या तरुण पिढीचे चित्रण केले आहे. रत्नाकर हा बी.एस्सी. झाला होता. एमेस्सी करताना तो त्याला शिकवणाऱ्या देवधर सरांची मुलगी बीना हिच्या प्रेमात पडला. त्याने तिला लग्नाविषयी विचारले पण तिने हो-नाही काहीच न सांगता फक्त थांबायला सांगितले. त्याने शिक्षण अर्धवट सोडले आणि नोकरी करु लागला. जातीय प्रस्थाचे कारण सांगून त्याने ती ही नोकरी सोडून दिली. आता नवीन नोकरी हवी होती, पण त्याला किती तरी अर्ज येणार हे त्याला माहीत होते. म्हणून आपला निभाव लागण्यासाठी तो सरांच्याकडे आला होता. रत्नाकरच्या अंगी जास्त काम करण्याची धडाडी नव्हती. नऊ ते पाचवाली नोकरी त्याला हवी होती. उलट बीना एमेस्सी फर्स्टक्लासने पास झाली होती. तिचे लंडनमध्ये काही रीसर्च करण्याचा बेत होता. अशा प्रकारे कॉलेज हे फक्त प्रेम करण्यासाठी नसते तर शिक्षण घेण्यासाठी असते. हे सानियांनी दाखवले आहे. शिक्षण घ्यायची दिशा चुकली की आयुष्याची दिशा चुकते हे या कथेवरुन लक्षात येते.

'दुहेरी' मध्ये अजित आणि कालिदास ही दोन प्रमुख पुरुष पात्रे आहेत. अजित हा इंजिनिअर आहे, तर कालिदास हा क्लार्क म्हणून काम करतो. अजितच्या बायकोशी कालिदास हा अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करतो. पण त्या वेळी ती त्याच्या तोंडात मारते. याचा वसूल म्हणून कालिदास त्याच्यावर खुनी हल्ला करतो पण अजित बचावतो. अजित हा शहरातून आदिवासी भागात काम करण्यासाठी आलेला असतो. कालिदास हा त्याच्या कडून बऱ्याच गोष्टी शिकला होता. कालिदासला आपल्या जातीतील लोकांची लाज वाटत असते. पण त्याच्या वडिलांना वाटत असते की, अजित कालिदासला त्याच्या जातीपासून लांब नेत आहे म्हणून ते त्याच्यावर राग धरुन असतात. म्हणूनच त्याच्यावर हल्ला झाला होता. शेवटी एका जातीतील लोक दुसऱ्या जातीतील लोकांना आपल्यामध्ये समाविष्ट करुन घेत नाहीत हेच इथे दिसून येते.

'खिडक्या' मधील पद्मनाभ लेखक असतो. त्याला बायकोविषयी खूप प्रेम असते. पण त्याने मुलीला आपल्यापासून कायमचे दूर ठेवलेले असते. अचानक त्याच्या बायकोला- जयंतीला त्याच्यापासून दूर राहण्याची लहर येते. तरीही तो तिला पत्र पाठवत राहतो. आपल्या लिखाणात तिला चित्रित करतो आणि एके दिवशी हृदयविकाराचा झटका येऊन मरण पावतो. जयंती त्याचे लिखाण कधीच वाचत नसे. तो मरण पावल्यावर जयंती त्याचे अप्रकाशित लिखाण वाचते तेव्हा शेवटपर्यंत त्याला आपल्याबद्दल आत्मीयता होती हे वाचून तिला खूप दु:ख होते. शेवटपर्यंत पद्मनाभ तिच्याशी प्रामाणिक राहिला होता. पण तसा त्याने सुमावर, आपल्या मुलीवर अन्याय केला होता.

'संदर्भ' कथेतून डॅनियल आणि ललितचे चित्रण केले आहे. डॅनियल तीन वर्षाच्या कराराने भारतात आलेला असतो. त्याला बायको अणि एक मुलगा असतो. भारतात आल्यावर त्याची ओळख कावेरीशी होते आणि पुढे प्रेमात रुपांतर होते. तो परत जाताना कावेरीला घेऊन गेला असता पण तीच जायला नकार देते. ललित हा तिच्या ऑफिसमधील बॉसचा मुलगा. ललितसाठी त्यांनी कावेरीला मागणी घातलेली असते पण ती लगेच तयार होत नाही. ललितचे आयुष्य सरळ, सोपे नसते. त्यामुळे त्याने खूप भानगडी केलेल्या असतात. शेवटी तिला जाणीव होते की, जर ललितबरोबर लग्न केले तर या सगळयातून तिला जावे लागणार होते. कावेरीसाठी हळवा होणारा डॅनियल आणि

कावेरी लग्नाला होकार देत नाही म्हणून तिच्या कानफटीत लावणारा ललित दोघांमध्ये कितीतरी फरक दाखवला आहे.

'स्वाध्याय' कथेत विश्रामराव हा एक वकील असतो. पण त्याला आपल्या बायकोच्या-पद्मिनीच्या वेगाबरोबर धावता येत नाही. तो तिला तिचा वेग कमी करायला सांगतो. पण तिची धाव क्षितीजापर्यंत असते. शेवटी तो दारु प्यायला लागतो आणि दारुमध्येच बुडून मरतो. नाना पद्मिनीचे वडील. ते नेहमी तिचा द्वेषच करायचे. तिला आदरार्थी बोलायचे. पण त्यात एक प्रकारचा द्वेषच असतो. विश्राम जेव्हा दारु पिऊ लागला, तेव्हा त्याला त्यापासून परावृत्त न करता उलट त्याला साथच देतात. जेव्हा तो दवाखान्यात शेवटची घटका मोजत असतो तेव्हा त्याला शेवटपर्यंत साथ देतात. नाना शाळा मास्तर असूनदेखील त्यांच्या अंगी असणारे हे गुण त्याच्या व्यवसायाविरोधी ठरतात. पद्मिनीबरोबर सोबत असलेल्या सुमंतचा उल्लेख 'पद्मिनीचा यार' म्हणून करतात. तो जर तिथे नसता तर त्यांनी पद्मिनीचा गळाच पकडला असता. आपल्या बायकोची यशस्वी वाटचाल न पेलणारा विश्राम आणि यशाची चढती कमान सर करणारी आपली मुलगी हिला सतत मागे ओढणारे नाना या दोघांचे चित्रण सरस उतरले आहे.

सानियांच्या कथेतील सर्वच पुरुष शिक्षित आहेत. त्याचप्रकारे ते सहनशील आहेत. आपण काय कमावले आणि काय हरवले आहे याची जाणीव त्यांना आहे. आपल्या परिस्थितीची त्यांना जाणीव आहे. ते स्त्रियांवर अन्याय करत आहेत असे फारसे दिसून येत नाही. त्यामुळे त्यांच्याबद्दल सहानुभूती वाटते. त्याचप्रमाणे त्यांच्याकडे कमालीचा समजूतदारपणा आहे. हे 'खिडक्या' कथासंग्रहातून दिसते.

### ४ ) 'खिडक्या' कथासंग्रहमधील निसर्गचित्रण :-

'खिडक्या' या कथासंग्रहात थोडयाप्रमाणात निसर्गाचे चित्रण आलेले आहेत. सानिया निसर्गापेक्षा माणसाचे नाते महत्वाचे मानतात. पण त्या मानवी नात्याच्या शोधाबरोबर निसर्गाचे चित्रण आलेले आहे. 'हिवाळयातील पहिला दिवस' मध्ये त्यांनी थंडीचे चित्रण खूप चांगल्या रीतीने केलेले आहे. ''प्राध्यापक बर्वे घरातून बाहेर पडले तेव्हा सहा वाजत होते. काळोख अजून नीटसा संपलेला नव्हता, विशेषत: झाडा-झाडांतून अधिकच अडकलेला होता. उजळत चाललेल्या आभाळात इकडे-तिकडे थोडया

चांदण्याही टिमटिमत होत्या. या अंधारावरून हिवाळा जवळ येत चालला आहे, जवळपास सुरुच झाला आहे. या गोष्टीचा बव्यांना खूप आनंद झाला. पहाटे-पहाटेची गार थंडी त्यांच्या कानांना लडिवाळपणे घसटायला लागली. मग खूप भरुन वास घेतल्यावर तर ती थंडी थेट फुफ्फुसात पोहोचली. " (पृ. ७३)

याच कथेतील सूर्योदयाचे वर्णन पुढीलप्रमाणे आलेले आहे. "केवढंतरी उजाडलं होतं. पूर्वेकडून लाल-नारिंगी झालेलं दिसत होत. मघाच्या चांदण्या वगैरे नव्हत्या. आभाळ अगदी मोकळं निळं. थंडी सुखावणारी. वातावरण अगदी धुकट धुकट. आजूबाजूच्या, समोरच्या इमारती, घरं धुक्यातून उचलून वर आल्यासारख्या." (पृ. ७४)

काही वेळा सानिया एखाद्या वाक्याने देखील निसर्गाचे वर्णन करतात."कसली सावली पडल्यासारखे काहीसे गढूळ वाटत होते. म्हणून तिने खिडकीबाहेर पाहिले. पावसापूर्वीचा थंडसा उजेड बाहेर मावळतच होता. म्हणजे थोडयाच वेळात जोरात पाऊस सुरु होणार."-(प्रारंभी खेळाच्या,पृ. १०३) याच कथेत पावसाचे वर्णन पुढील प्रमाणे आले आहे, "बसमध्ये अतिशय गर्दी होती आणि पावसामुळे सगळे चिखलमय, कोंदट झाले होते." (पृ. १०६), "किरणने दार उघडताच थंडगार हवेचा झोत अंगावर आदळल्याप्रमाणे झाले. बाहेर वाकडातिकडा पाऊस पडत होता आणि रस्त्यावरचे दिवे अगदी मंद, अंधूक दिसत होते." (पृ. ११०)

'पावसाळयातली गोष्ट' या शीर्षकावरुनच थोडयाफार पावसाची कल्पना येते. पण ती वर्णने सलग नाहीत, तुटक तुटक आहेत. "बाहेर जीवघेणा पाऊस आतही दाटलेले मळभ." (पृ. ११७), "युनिव्हर्सिटीचा परिसर खूप मोठा, हिरवागार, रम्य होता." (पृ. १२३), "बाहेर पडेपर्यंत रात्रच झाली होती. संध्याकाळी एकच सर येऊन गेली होती, पावसाची. त्यामुळे गारठा होता.", "येताना बारीक पाऊस सुरू झाला गारठाही वाढला. भोवती स्तब्ध रात्र होती." (पृ. १३२)

'चाफा' या कथेत ऊन्हाचे वर्णन आलेले आहे. "स्टॉपपासून घरापर्यंत येता येता रत्नाकर घामाघूम झाला. चारचे ऊन्ह आजून दाहक होते. वारा अगदी नव्हता. आणि सगळेच एकूण चिडचिडल्यासारखे होते." (पृ. १५२) पहाटेच्या थंडीचे वर्णन पुढील प्रमाणे आलेले आहे. "पहाटेचा प्रकाशही पुरता पसरलेला नव्हता... थंड वाऱ्याचे झोत

अंगावर चाल करुन आले... आणि काही क्षण अनोळखी प्रदेशात लहान स्टेशनवर अंधारात थंडीत एकटेच उभे राहताना कसे वाटते तो अनुभव आला.'' (दुहेरी,पृ.१६२) याच कथेतील ऊन्हाचे वर्णन ''झोपेतून जागी झाले तेव्हा खिडकीबाहेर सगळे कोवळया उन्हात चमकत होते. मी खिडकीशी येऊन उभी राहिले. बाहेर प्रशस्त बाग फुललेली होती. कितीतरी झाडे, फुलांचे ताटवे. हे सगळे पूर्वी चित्रातच कधी पाहिले असावे. ऊन सगळीकडे सांडल्यासारखे पसरलेले.'' (पृ.१६४), ''सगळा परिसरच स्वप्नात पाहिल्याप्रमाणे वाटत राहिले. विस्तीर्ण निळया पाण्याचा जलाशय, झाडे, विलक्षण शांतता आणि गच्च भरलेल्या फुलाचा अनोळखी वास.'' (पृ.१६६) किती छान वर्णन येथे केलेले दिसून येते.

''दुहेरी''कथेतील पावसाचे वर्णन सानिया पुढील पद्धतीने करतात. ''तेव्हा हलकासा पाऊस सुरु झाला. झाडांतून पडणारा पाऊस सुद्धा हिरवा, रंगीत आहेसे वाटत होते. आम्ही तसेच थंडगार वारा-पाऊस अनुभवत उभे राहिलो. पलीकडे जलाशयावर शुभ्र हलका पडदा तयार झाल्याचे दिसत होते. एकदम अधिकच अंधारुन आले. मी अजितच्या जवळ सरकत म्हणाले. ''हा खरंच कुठला ॠतु चालू आहे इथं? पाऊस, थंडी-काही समजेनासं झालं आहे.'' (पृ.१६९) किती सुंदर रीतीने पावसाचे वर्णन केलेले आहे. ''रात्री अगदी भयाण वारे सुटलेले होते. पाऊस सतत वाढत होता. दारे-खिडक्या बंद करूनही मधूनच काही आपटल्याचा, पडल्याचा आवाज येत राहिला.'' (पृ.१७५) असेही पावसाचे वर्णन येते. ''खिडक्या कथेत ऊन्हाचे वर्णन आलेले आहे. ''सकाळचे ऊन्ह बाहेर सांडल्यासारखे सगळे प्रसन्न दिसत होते. आकाश गर्द निळे आणि मोकळे होते. दूरवर डोंगराच्या रांगाही स्पष्ट दिसत होत्या.'' (पृ.१८३)

''वारा तोंडावर सपकारे मारत होता आणि एकाएकी मला पावसाचा सूक्ष्म जाणवल्यासारखे उत्तेजित वाटू लागले.'', ''खाली उतरुन आम्ही समुद्रकडेला येऊन उभे राहिलो. बाहेर थोडा पाऊस पडून गेल्याचे जाणवत होते. वारा अगदी थंडगार झालेला होता.'' (संदर्भ पृ.१७०) 'स्वाध्याय' कथेतील बागेचे वर्णन ''बंगल्याच्या मागेही मोठी बाग होती. माळी आणि त्याच्या कुटुंबाच्या खोल्या होत्या. भाज्यांचे वाफेचे वाफे होते. आणि पलीकडे शेतं हिरवीगार. मग अगदी टेकडयाच सुरु झालेल्या.''(पृ.२०) ''रस्ता

पूर्ण अंधारा. रातकिडयांचा आवाज आणि वर लखलखतं आभाळ. सौम्यशी प्रसन्न थंडी.''(पृ.२६) ''एकप्रकारचा उदास दबता दिवस पूर्वेकडून हळूहळू उगवतो आहे अस वाटायला लागलं.''[५](पृ.२९)

अशा प्रकारे सानियांनी निसर्गातील ऊन, थंडी, पाऊस या तिन्ही ऋतूंचे काही ठिकाणी समरसून, तर काही ठिकाणी अलिप्तपणे वर्णन केलेली आहेत. त्यांनी मुद्दामहून ही निसर्गवर्णने त्यात घुसवली नाहीत तर प्रसंगाच्या अनुषंगाने त्यात ती रंगवली आहेत. त्यामुळे कथेला देखील चांगला उठाव मिळाल्याचे दिसून येते. पण भाषा एवढी प्रभावी आहे की, पुढे साक्षात निसर्गच आपल्यापुढे उभा राहतो.

**५ )नायिकांचे मनाशी चालणारे संवाद/स्वगते :-**

''सानियाचे लेखन हे एकूणच नायिकाप्रधान आहे. त्यातही या नायिकांचा एक साचा नसला तरी त्यातील बहूतेक समाजाच्या उच्च संपन्न स्तरातील आलेल्या दिसतात. त्यांची घरे मोठी मोकळी रेकॉर्डर्स व पुस्तकांनी भरलेली असतात. त्यांच्या सुबत्तादर्शक राहणीमानाचे, क्वचित गाडयांचे, मंद दिव्याच्या प्रकाशात, निवडक कर्तबगार लोकांच्या संगतीत घडणाऱ्या पाटर्यांचे उल्लेख जागोजागी येतात. या माणसांचे एकमेकांशी येणारे संबंध, त्यात होणारी गुंतवणूक, तिची शाश्वतता, अशाश्वतता याचाही त्यांनी आपापल्या मनात विचार केलेला असतो. व त्याप्रमाणे ती वागत असतात, बोलत असतात. खरे तर वागण्यापेक्षा जास्त बोलतच असतात. त्यातही संवाद व चर्चा यापेक्षा अंतर्मुख होऊन म्हटलेली स्वगतेच पुष्कळ असतात.''[६]

''वसू त्याच्या खोलीत होता. कालिंदीला वाटलं तो कदाचित तिथंच राहील. मग प्रश्न आपोआपच सुटला. तसं त्याला बोलावून ओळखी करुन दयायला काही हरकत तिलाही दिसेना. पण तरीही मनात कुठं तरी वाटत राहिलं ते बरोबर फिट् होणार नाही नकोच ते.'' (एकदा जाग आली, पृ.१२)

''मग आपल्याही मनात गेले काही दिवस सारखं कुरतडत असून का आपण इतक्या शिताफीन हे सगळंच टाळलं? दीप्तीला हे कधीतरी कळेल का, की केवळ आपल्या धाकटया बहिणीमुळे आपण वाचलो?'' (वय, पृ. ३१) ''एक प्रकारचा गंध जाणवतो सतत आपल्याला. तो खराच असू शकतो की मानसिक? अगदी सुरवातीच्या

दिवसापासून. त्यामुळेच वेडयासारख्या ओढल्या गेलो की काय? अजूनही तो वेढूनच राहिला आहे आपल्याला असे वाटते." (स्त्रोत, पृ.५२)

"तिला वाटलं की, काही रस्त्यांना पळवाटा फुटलेल्या असतच नाहीत. जशा मम्मींच्या. त्यांच्यापुढे पर्याय होते का? स्वतंत्र एकटीचे? पपांबरोबर किंवा मागोमाग राहूनच जे काही पदरात पडत होतं ते अपूर्वच नव्हतं का?" (वाटा, पृ.६८) "बव्यींच्या शरीराला तो सगळा रेखलेला मार्ग फेकून द्यावासा वाटला. पुन्हा सैलावलेलं मन इकडेतिकडे टपकलं. अनेक विसरलेले, आठवलेले चेहेरे."(हिवाळयातील पहिला दिवस, पृ. ८२)

"मी जड मनाने आणि जड पायांनी घरी परतले. मनात वाईट वाटतच होतं की काय हे, दोन्ही फ्रंटवर ही निराशा. कस्तरीकडून, संतोषकडून. दोन्ही संबंध आता तोडावे लागायची वेळ येऊन ठेपली. किती छोटया छोटया गोष्टी असतात आयुष्यात!" (शिल्लक, पृ.९७) "नंदिता हादरल्यासारखी झाली. आपण नाकारत असूनही किरणचे जगच कसे आपल्याला दूर ओढून नेत होते ते लक्षात येऊन, तिला काही सुचेनासे झाले. ती सुरुवात तर पुस्तकापासून झाली. त्याच्या पुस्तक, त्याचे लिहिणे, बोलणे, त्याची प्रसन्नता, गाण्याचे विश्व, भाबडेपणा आणि त्याचा सगळा सहवास." (प्रारंभी खेळाच्या, पृ.११३) मोनिकाला आपली मानसिक अवस्था कळते तेव्हा ती स्वत:ला म्हणते "पूर्वी अडचणींचा पाढा वाचू नका म्हणून सगळयांना सांगितले. ते हेच होते तेही माहीत होते. मग पूर्वी जे स्वीकारायची, तरुन जायची जिद्द होती ती आता कुठे गेली? इतके हरल्यासारखे वाटणे ठीक आहे का?"(पावसाळयातील गोष्ट, पृ. १२६) "साधना अधिकच धुसफुसली, पण स्वत:शीच. समजते कोण ही मला? कुकुलं बाळ की काय? इतके दिवस ... इतके दिवस झाले. दादांनी सरळ असं वागावं अन् माईनं ते खपवून घ्यावं? आणि मधल्या मधे आपल्याला अज्ञानात ठेवावं, मूर्ख समजून? ही काय रीत झाली? " (दुसरं घर, पृ.१४६)

"देवधर करतील तेवढं काम? सगळे निदान सरळ तरी होईल ना? की कुणाचे लक्षच जाणार नाही आपल्याकडे? की हसण्याचे एक गरीब साधन होऊन जाऊ आपण?.." (चाफा, पृ.१६१) रत्नाकरच्या मनाचा स्वत:शीच अशा प्रकारचा संवाद चाललेला दिसून येतो.

"आता त्या गर्द रानात अजित बरोबर एकटीच असताना मनात आले, ओळखीची सुरवात आहे ही, सगळा सावधपणा मनात असायला हवा. मागाहून असे वाटू नये की, सुरवातीची दक्षता कमी पडली." (दुहेरी, पृ.१६७)

"खिडक्या" कथेतील पद्मनाभ मेल्यानंतर जयंतीला वाटते,"ते क्षण आता येणार नाहीत तर! आले असते तर? पूर्वीचे सगळे ताजे झाले असते. एखाद्या सहज, शक्तिवान प्रवाहासारखे ते दिवस, कदाचित पद्मनाभही त्यांची वाट पहात असावा. त्याने यापूर्वीच हे कळवले का नाही आपल्याला?" (पृ. १८७) "स्वाध्याय" कथेतील विश्राम शेवटची घटका मोजत आहे हे जेव्हा पद्मिनीला कळते तेव्हा पद्मिनी स्वत:चीच विचार करते. "फोन ठेवल्यावर ती कितीतरी वेळ तशीच उभी राहिली. भोवती अगाध शांतता. तिनं घडयाळ पाहिलं. साडेअकरा वाजून गेले होते. यावेळी कसं जाणार? कुठली गाडी किंवा बस तिला मिळणार होती? म्हणजे सकाळपर्यंत... पण तोपर्यंत विश्राम राहणार होता का?"(पृ. २५) हा नायिकांचा, नायकांचा जो स्वत:शीच चालणारा एक अनोख्या प्रकारचा संवाद आहे तो कधीही न संपणारा आहे. मनाचे भावहिंदोळे टिपण्याचा सानियांनी प्रयत्न केला आहे.

**६ )'खिडक्या' कथासंग्रहामधील संवाद :-**

हे संवाद नवरा-बायको, प्रियकर-प्रेयसी, मित्र-मैत्रिणींची आहेत. जसे नायक-नायिकांचे मनाशी संवाद आहेत तसेच परस्परांशी असणारे संवाद देखील खूप साधे, सोपे आणि सरळ आहेत. त्यामध्ये अजिबात कृत्रिमपणा जाणवत नाही.

या कथासंग्रहात स्त्रियांच्या विविध समस्येवर आधारित असलेल्या एकूण १४ कथा आहेत. संवाद खूपच आकर्षक आहेत आणि खूपच हलके-फुलके आहेत. ते पुढील प्रमाणे-

१) सुजातानं अभ्यास करता करता मधेच विचारलं "त्या दिवशी मी तुला सांगितलेल्या गोष्टीचं काय झालं गं?"

कुठल्या ते माहीत असून मुद्दाम वेड पांघरत आश्विनीनं विचारल, "कुठल्या?"

"तुझ्या बहिणीच्या ग..."

"ते होय!.. " ती गप्प बसली.

"सांगितलस आईला?"

"छे!"

"मग? तिच लग्न मोडेल की त्यामुळे!" (वय, पृ.२८)

२) "अजून नक्की नाही."

"लवकर ठरवायला हवं. जितका उशीर करशील तितकं..."

"पण काय करु ग? निर्णयच घेता येत नाही."

"नवरा काय म्हणतो?"

"सांगितलंय कुठं त्याला!"

"हद्द झली तुझ्यापुढं!" "काही बिनसल आहे का?"

"थोडसं!" मिनू चाचरत म्हणाली. (वाटा, पृ.६५)

अशा छोटया छोटया संवादातून कथा उलगडत जाते आणि हे संवाद प्रसंगाच्या ओघाने, ओघवते आलेले आहे. कुठेही बोजडपणा दिसत नाहीत.

३) घर आल्यावर रती किल्ली घेऊन चटकन पुढे गेली. विद्याधर मोनिकाला थांबवत म्हणाला "मोनी रागवणार नसलीस तर एक सांगणार आहे."

"काय?"

"आज आला होता तो-मघाशी संध्याकाळी-सध्या त्याची स्थिती फार वाईट आहे. नोकरी नाही, वडील गेले अचानक-"

"विद्याधर!" ती शांतपणे म्हणाली, "मुद्याचं बोल. लांबण कशाला?"

तो हसला. "हुशार आहेस तू...त्याला मदत हवी आहे."

"किती दिलेस?"

"नाही मोनी, दिले नाहीत. पैशाची मदत नंतर. त्याला काही दिवस आपल्याकडं राहायला सांगणार आहे. चालेल."

"मला विचारतो आहेस?—तू सांगितलंच असशील त्याला. स्वत: बुडता बुडताही दुसऱ्याला वाचवायचा हव्यास तुझा, माहीत नाही का मला?"

"बुडणारेच एकमेकांना वाचवतात, मोनिका! ज्यांना बुडण्याचीच भीती नाही त्यांना वाचविण्याची दुसऱ्याला किंमतच काय?" (पावसाळयातली गोष्ट, पृ.१३३)

अशा प्रकारे एकापेक्षा एक सुंदर संवाद सानियांनी आपल्या कथासंग्रहात शब्दबद्ध केलेले आहेत. सहज, सुंदर संवाद आणि मनाशी चालणारी स्वगते हे त्यांच्या 'खिडक्या' कथासंग्रहाचे खास वैशिष्टय आहे. हे संवाद वाचताना ते पात्रच आपल्या नजरेसमोर उभे राहते. असे हे संवाद वाचताना मनाला एक प्रकारचा चटका लावून जातात. या संवादातून कथेतील पात्रांचा देखील परिचय होतो. त्यामुळे कथेला पुढे नेणारे संवाद खूप महत्वाचे वाटतात.

**७ ) 'खिडक्या' कथासंग्रहमधील वाक्प्रचार :-**

'खिडक्या' या पुस्तकाच्या जुन्या आवृत्तीत एकूण १४ कथा आहेत. या सर्व कथा म्हणजे वाक्प्रचार, म्हणी, मराठी शब्दाबरोबर, इंग्रजी शब्द यांची सहज, सुंदर गुंफण केलेली साखळीच वाटते. या कथासंग्रहामध्ये सानियांनी टप्याटप्यावर वाक्प्रचार, हिंदी, इंग्रजी शब्द, अभ्यस्त शब्द, छोटी छोटी वाक्ये या सर्वांमुळे त्यांच्या सर्वच कथा रोचक बनल्या आहेत. इंग्रजी शब्दाचा वारेमाप वापर केल्यामुळे कथेवर आधुनिकतेचा साज चढला आहे. अशा या कथासंग्रहातील वाक्प्रचार पुढीलप्रमाणे.

**१ ) एकदा जाग आली :-**

हात पसरणे, भरभराटीला येणे (पृ. ६), लुप्त होणे , शीण येणे, (पृ.७), डोके चालवणे, सणक येणे, स्तब्ध होणे (पृ.८), जीव भांडयात पडणे (पृ.१०), ऐट असणे (पृ.१२), डोळयात पाणी येणे (पृ.१४), तंबू ठोकणे, सैरभैर होणे, पारखे होणे (पृ. १५),अवचित येणे, कळवळा येणे(पृ.१६), कवेत ओढणे, भोवळ येणे(पृ.१८), भरुन येणे, हताश होणे (पृ.१९), गराडा असणे (पृ.२०), नशीब फळफळणे, डाचत राहणे, तल्लख वाटणे, चालता होणे (पृ.२१), उडवून लावणे (पृ.२२), पाणी असणे (पृ.२३).

**२ ) वय :-**

पार करणे(पृ.२४), चुकल्यासारखे होणे (पृ.२५), शरमल्यासारखे होणे (पृ.२५), चेव येणे, तंद्री भंग करणे (पृ.२६), विश्वासघात करणे, नाचक्की होणे, भानगड करणे, हैराण करणे, वेड पांघरणे(पृ.२८), नाक खुपसणे(पृ.२९), तंद्री लावणे, शिंग फुटणे, दचकणे, खरडपट्टी काढणे (पृ.३१), आ वासणे, घास अडणे, शहारणे (पृ.३२), पुरेवाट होणे, आवाज जड होणे, दगा देणे, भरुन येणे (पृ.३३), मन रमणे, गांगरणे, सुस्कारा

टाकणे, रोमांच उठणे (पृ.३५), चेहरा पडणे, मन मारणे, पाय लटपटणे (पृ.३६), हताश वाटणे, ह्रदयाचे तुकडे तुकडे होणे (पृ.३७).

**३ ) स्त्रोत :-**

गळल्यासारखे होणे, कोरड पडणे, चलती असणे (पृ.४३), रस नसणे (पृ. ४४), मागमूस नसणे (पृ.४५), कीव येणे (पृ.४६), उणीव भासणे (पृ.४७), चलबिचल होणे (पृ.४८), बुडून जाणे (पृ.४९), पापण्या जड होणे, डोळे दिपणे, आवाक होणे (पृ. ५०), भान विसरणे, याचना करणे (पृ.५१), नामोहरम करणे (पृ.५२), हर्ष होणे, मर्म उलगडणे, आवाज जड होणे, सामसूम होणे (पृ.५३), मूक होणे, चाहूल लागणे(पृ. ५४), खिळून राहणे (पृ.५५).

**४ ) वाटा :-**

शिक्का बसणे (पृ.५६), धक्का बसणे, नेट धरणे, आवेश येणे, टक लावून पाहणे (पृ.६०), ऊणं काढणे (पृ.६१), कार्यभाग साधणे, असंबध्द बोलणे (पृ.६४), हाव असणे, मग्न असणे, मजल जाणे (पृ.६५), बाता मारणे (पृ.६८), निर्धार बांधणे, चेहरा उजळणे, गुदमरल्यासारखे होणे (पृ.६९), डोकं वर काढणे, विश्वासघात करणे, सूड घेणे (पृ.७०), बुडल्यासारखे वाटणे, मनस्ताप देणे(पृ.७१).

**५ ) हिवाळयातला पहिला दिवस :-**

घसटायला लागणे, बेपर्वा होणे (पृ.७३), रेंगाळणे (पृ.७५), दाटून येणे, लोभ असणे, आटापिटा करणे (पृ.७५), वाहवा मिळवणे, फिकीर करणे, बंड करणे, उपद्व्याप करणे, हमरीतुमरीवर येणे (पृ.७६), शहारे येणे, लचांड लागणे, हमी घेणे (पृ. ७७), खजिल होणे, शरम वाटणे (पृ.७८), पार पाडणे, चक्कर टाकणे, धास्ती असणे, कोटया करणे, जीव मुठीत धरणे (पृ.७९), असूया वाटणे, बिचकून असणे, ओतप्रोत भरणे, अंगार असणे, ममत्व वाटणे (पृ.८१), कुवत नसणे (पृ.८२).

**६ ) शिल्लक :-**

भारून जाणे, मनोरथ बांधणे (पृ.८४), तर्क करणे, धास्ती घेणे, धीर सुटणे (पृ. ८५), घायकुतीला येणे, वर्मी लागणे (पृ.८७), ताडताड बोलणे (पृ.८८), उबग येणे, बाता मारणे, खचून जाणे, मुठी आवळणे, आवाज फुटणे (पृ.८९), निचरा होणे, टोचणी

लागणे, फटकारुन टाकणे, कळस होणे (पृ.९१), थारा देणे, गरम होणे (पृ.९२), कटाक्ष टाकणे (पृ.९३),डोक उठणे, घर उचकटणे (पृ.९४), लाही लाही होणे (पृ.९५), खांदे उडवणे, निषेध करणे (पृ.९६), मांडे खाणे (पृ.९७), ग्लानी येणे (पृ.९९), उन्मळून पडणे, मान झुकवणे, फटफटीत पडणे, हंबरडा फोडणे (पृ. १००), मनाचा बांध कोसळणे, मटकन बसणे (पृ. १०१).

**७ ) प्रारंभी खेळाच्या :-**

स्तब्धपणे पाहणे (पृ.१०६), मनसोक्त ऐकणे, वदून जाणे (पृ.१०७), हेका धरणे, बाणा असणे, हादरुन जाणे (पृ.१०८), थरकाप होणे, हतबल वाटणे, आक्रोश करणे, दम लागणे, गोठून जाणे, काबूत ठेवणे (पृ.१०९), खोळंबा होणे (पृ.११०), डाग देणे, निखारा फुलणे (पृ.१११), कासावीस होणे, हवाली करणे, गळयात बांधणे (पृ.११४).

**८ ) पावसाळयातली गोष्ट :-**

पराकाष्टा करणे, भानावर येणे (पृ. ११७), चेहरा खुपसणे (पृ. १२०), हरखून जाणे, डोळे वटारुन पाहणे (पृ. १२२), तन्मयतेने सांगणे, साक्षात्कार होणे, गुंतून जाणे, थक्क होणे, गुंगी येणे, पाढा वाचणे, धीर सुटणे (पृ. १२३), अधीर होणे (पृ. १२४), निभावून नेणे, अंर्तभाव करणे, सांत्वन करणे, (पृ. १२५), चैन करणे, उणीव भासणे (पृ. १२६), आयती सोय होणे, आव आणणे, फाटे फोडणे (पृ. १२७), झडप घालणे, गांगरुन जाणे, डोके शिणवणे (पृ. १३२), हेवा वाटणे (पृ. १३४), चपराक मिळणे, सावरुन घेणे (पृ. १३५), हातापायात त्राण नसणे, हबकणे (पृ. १३६), डोळे दिपणे (पृ. १३७).

**९ ) दुसरं घर :-**

लक्ष न ढवळणे, खिजगणतीत नसणे, पथ्यावर पडणे (पृ. १३९), सुस्कारा टाकणे, छाती नसणे, टीका करणे, बुजल्यासारखे होणे (पृ. १४२), कुणकुण लागणे, पराचा कावळा करणे, ऐट दाखवणे (पृ. १४३), खचून जाणे, शिणून जाणे, तोंडाची चव जाणे (पृ. १४४), डोळे विस्फारणे, बुचकाळयात पडणे, मूक होणे (पृ. १४५), अप्रूप वाटणे, धुसफूसणे (पृ. १४६), डुलकी लागणे, संकोचून जाणे, गलबलून येणे (पृ. १४७), थरकाप होणे (पृ. १४८), पर्वा न करणे, ठाम असणे (पृ. १५०).

**१० ) चाफा :-**

घामाघूम होणे (पृ. १५२), ओशाळून जाणे, डाव उलटणे, मात करणे, कानावर घालणे, शब्द टाकणे, अचल असणे (पृ. १५४), आवाज उठवणे, उचलून धरणे, आशा दाखवणे (पृ. १५५), मन झुरु लागणे, खुजट वाटणे, खिजवत राहणे, खदखदून हसणे, टक लावून पाहणे (पृ. १५६), सैलावून बसणे, जीव असणे (पृ. १५८), डोके चढणे, गुंग असणे, व्याकूळ होणे (पृ. १५९), उमेद येणे (पृ. १६०), तोल जाणे, पोरके वाटणे (पृ. १६१).

**११ ) दुहेरी :-**

अंगावर चाल करुन येणे (पृ. १६२), रंग ओळखणे, खजिल होंणे (पृ. १६४), चपापणे (पृ. १६५), दखल न घेणे, निराधार होणे (पृ. १६६), अंगात मुरणे, तिटकारा येणे, बधीरता येणे (पृ. १६८), अंधारुन येणे, मनात ठेवणे (पृ. १६९), त्रागा करणे (पृ. १७०), थैमान घालणे, धीर सुटणे (पृ. १७१), हृदयाचा ठोका चुकणे, हेटाळणी करणे(पृ. १७२), हातपाय गारठणे, कल्लोळ उठणे (पृ. १७३), प्रहार करणे, कोलमडून जाणे, दम खाणे, धूसर होणे (पृ. १७४), धक्का बसणे, अवसर न देणे (पृ. १७५), आमिष दाखवणे (पृ. १७८), हतबुद्ध होणे (पृ.१७९), चिथावणी देणे (पृ.१८१).

**१२ ) खिडक्या :-**

गोठून जाणे, मागोवा घेणे (पृ. १८२), खंबीर असणे (पृ. १८३), खंत वाटणे, उणेपणा येणे, बधीरता येणे (पृ. १८४), खच्ची करणे, मुकाट होणे (पृ. १८५), दडपण येणे, डोक भणाणणे, स्थगित करणे (पृ. १८६), खर्ची करणे, कोलमडून जाणे(पृ. १८७), विरुन जाणे (पृ. १८९), पाठ फिरवणे, तथ्य असणे (पृ. १९१).

**१३ ) संदर्भ : -**

बेत रचणे, पाणी फिरवणे (पृ. १५९), पवित्रा घेणे, वार करणे, सपकारे मारणे, उत्तेजित वाटणे (पृ. १६०), आकस धरणे (पृ. १६१), शब्द देणे (पृ. १६२), घशात घालणे, मोह पडणे (पृ. १६३), प्रज्वलित होणे (पृ. १६९), उमेद सोडणे, विश्वासघात करणे (पृ. १६४), गवगवा करणे (पृ. १६७), ढसाढसा रडणे (पृ. १७१), निखळून पडणे (पृ. १७२).

१४ ) **स्वाध्याय :-**

तंद्री मोडणे (पृ. १९), दात विचकणे, दिमतीला असणे (पृ. २०), मान राखणे, शिरशिरी येणे, त्राण न उरणे (पृ. २१), टाप नसणे (पृ. २२), तिडीक उठणे (पृ. २३), कीव येणे, रग जिरवणे, मन मोठे करणे, चळाचळा कापणे (पृ. २४), हेलपाटत राहणे, जिवाची लाही होणे (पृ. २५), थरकाप होणे, सोस असणे (पृ. २६), गळाला लावणे, उमाळा येणे, तिरीमिरीत उठणे, गरम होणे (पृ. २७), हुज्जत घालणे (पृ. २८), टेंभा मिरवणे, कासावीस होणे, खांदे पाडणे (पृ. २९), मुठी आवळणे, हातभार लावणे, वावडया उठवणे, ममत्व वाटणे. (पृ. ३०).

'खिडक्या' हा कथासंग्रह आतापर्यंत दोन आवृत्यांमध्ये प्रसिद्ध झालेला आहे. दुसऱ्या आवृत्तीमध्ये दोन कथा वगळण्यात आलेल्या आहेत. या सर्व कथा म्हणजे इंग्रजी, हिंदी, मराठी शब्दाबरोबरच वाक्प्रचार, क्वचित एक दोन म्हणी, अभ्यस्त शब्द, छोटे छोटे संवाद, वाक्ये यांचा वापर केल्यामुळे कथा रोचक बनल्या आहेत. प्रत्येक पात्राच्या तोंडी इंग्रजी-मिश्रीत मराठी वाक्ये आहेत. त्यामुळे त्या कथांवर आधुनिकतेचा छाप पडलेला दिसून येतो. या कथासंग्रहात फक्त दोनच म्हणी आलेल्या आहेत.

१) एक घाव दोन तुकडे. (वय, पृ. ४६)

२) लहान तोंडी मोठा घास. (दुसरं घर, पृ.१४६)

**८ ) 'खिडक्या' कथासंग्रहमधील इंग्रजी शब्दांचा वापर :-**

**१ ) एकदा जाग आली :-**

आर्टरुम, ब्रश, डस्टर, रिसेप्शन, सोफा, माय गॉड!, लॉज (पृ. ५), आर्टस्कूल, ओके!, प्लीज, बॅच, ज्युनिअर, पेंटिंग्ज, चान्स (पृ. ६), ऑफिसेस, ग्रुप पार्टीज (पृ. ७), आय टेल यु, ही इज ए नाईस पर्सन ! लायटर, ऑफकोर्स !, आर्किटेक्ट, गुड्स, स्पॅघेटी ओ! आय जस्ट फेल इन लव्ह विथ हिज मेनीफोल्ड पर्सनॅलिटी, इंटरेस्टींग (पृ. ८), प्लीज, ओके!, टोस्टर, ब्रेड, ॲटोमॅटिक, फ्राय, रुटीन, बाथरुम, हॉल, ब्रेकफास्ट, प्लॅन (पृ. ९), मिनीबस, लंच-अवर, ऑपरेटर, पॅकिंग, मटेरिअल, ब्राउनपेपर, एनी वे(पृ. १०), बिझिनेस, माइंडेड, रिलेशन शिप्स, कॉन्ट्रॅक्ट, आर्ट गॅलरी, ड्रायरेक्टर, ड्रायर, फेव्हरेबल, ही इज व्हेरी एन्फ्लुएन्शिअल, डायनिंगटेबल, ड्रिंक्स, स्टीरिओ म्युझिक (पृ.

११), गुडमॉर्निंग, प्रोसेस, साइट (पृ. १३), किचन (पृ.१४), क्लब, टयुब्ज, गेस्टरुम, एजन्सी (पृ. १५), वन मॅन शो, प्रॉमिस, पेंट, प्रोग्रॅम (पृ. १६), पॉश, कमॉन, अब्सर्ड (पृ. १७), शॉवर, अपसेट, (पृ.१८) फर्निचर, रेडिओ, शेल्फ (पृ. १९), ब्रिलियंट, चार्म, सोकॉल्ड (पृ.२०), स्टोअर रुम (पृ. २१), पॅक, ड्रावर, स्वारी,आय डिडन्ट् मिन इट (पृ. २२), शोज, बोरींग, ट्रेकिंग (पृ. २३).

२) **वय :-**

बाल्कनी, हॉल, ग्राऊंड, प्लॉटस् (पृ.२४), क्लास, बिल्डींग (पृ. २५), ऑफिस, टेबललॅम्प, पॅड (पृ. २६), बेल (पृ.२७), बोर्ड,चॅप्टर (पृ. २८), टेबल, ड्रॉवर (पृ. २९), कॉलेज, थिएटर (पृ. ३०), ज्युनिअर, शो (पृ. ३१), शॉक, गेट (पृ. ३३),कॅन्टीन, कटलेट, हिरॉईन, डॉक्टर (पृ.३४), एनी वे.. ऑल दी बेस्ट, बाय बाय (पृ. ३८).

**३ ) स्त्रोत :-**

होल्डॉल (पृ. ३९), सर्व्हिस (पृ. ४०), क्लास, बॅच (पृ. ४२), प्रिन्सिपॉल, इकॉनॉमिक्स, शेडयुल्ड कास्ट, युनियन (पृ. ४३), केस (पृ. ४४), ग्रुप (पृ. ४५), प्रोसेस (पृ. ४६), डायरी, कॉलम्स (पृ. ४९), सरप्राइज (पृ. ५०), बसस्टॅंड(पृ. ५३), बॅग (पृ. ५५).

**४ ) वाटा :-**

पॅथॉलॉजिकल लॅब, रिपोर्ट, पार्टिशन, टाईप, पॉझिटिव्ह, प्रेग्नन्सी टेस्ट, स्टॉप, प्लॅनिंग (पृ. ५६), निगेटिव्ह, चान्सेस, कॅज्युअल (पृ. ५७), फॅक्टरी, पेपर (पृ. ५८), इंटरेस्ट, प्रेझेंटेशन, कॉमेंटस (पृ. ५९), पार्टी, ग्लास, डिसेन्सी, इन्डिसेंन्ट, बॉस (पृ. ६०), लिस्ट, टी.व्ही. (पृ. ६१), एक्झॅक्टली, पर्स, डिलिव्हरी (पृ. ६२), लायब्ररी, काऊंन्टर, शेल्फ, कार्ड(पृ. ६३), स्टेटस, प्लीज, शट-अप! (पृ. ६४), गायनॅक,घटस्फोट (पृ. ६५), प्रायॉरिटीज (पृ. ६६), गॅलरी, प्रॉब्लेम (पृ. ६७), मार्केट, लॅम्पशेड(पृ. ६८), रिंग,रिसीव्हर, वीकएंड, ट्रीप, बुक, बाय, डिझाईन (पृ. ६९), डॅम इट! (पृ. ७०), आय हेट यू!, डिटेक्टिव्ह (पृ.७१).

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

५ ) **हिवाळयातील पहिला दिवस :-**

हॉस्पिटल, सीरिअस (पृ. ७३), चेकअप, ब्लडप्रेशर, टयुटर (पृ.७४), स्टाफ (पृ. ७५), स्कूटर, लोन, सिन्सिअर, व्हाइस-प्रिन्सिपॉल (पृ. ७६), चेन, रस्टिकेट, लॉजीक, आय स्टिल रिस्पेक्ट यू (पृ. ७७), रेस्ट, फीलिंग, लेक्चर, कॉमनरुम, सीनिअर, किक, (पृ. ७९), पेन, लायब्ररी, लॉजीक, नोटस् (पृ.८०).

६ ) **शिल्लक :-**

हाऊसकीपर, टॅक्सी, ॲप्रन (पृ. ८४), अकाऊंटंट, होस्टेल, कॉमन (पृ. ८५), बाल्कनी, हॉल, ट्रेनिंग, प्रोग्रॅम, बोल्ट (पृ. ८७), सॉरी टू डिस्टर्ब यू, लोकल, पार्टी (पृ. ८८), कँडल स्टँड (पृ. ८९), थँक यू व्हेरी मच, मेनू, मेकअप, ड्रेस (पृ. ९०), नो थँक्स, पेन, बॉक्स (पृ. ९१), बोर्डिंग, चार्जेस, बँक बॅलन्स, फॉरेनर्स, ग्लॅमरस, (पृ. ९२), सीरिअस, आयडिया, मूड(पृ. ९३), ट्रेनिंग, हॉटेल (पृ. ९४),फ्रेश, डयुटी, स्पेशालिस्ट, ड्रायक्लिनर (पृ. ९५), किचन, हिंट, वेटर, बिल, स्टेशन (पृ. ९६), सिन्सीअर, सिरिअस, फास्ट, फ्रंट (पृ. ९७), सिनेमा, सूप, न्यूज (पृ. ९८), एंगेज्ड, एंगेजमेंट, सरप्राईज, पार्टी, फायर, ब्रेड, बॅग (पृ. ९९), ग्लुकोज, ॲडमिट, नर्स (पृ.१००), कॉल (पृ.१०१), चेक (पृ. १०२).

७ ) **प्रारंभी खेळाच्या :-**

मशीन, मिनीट, स्टॉप (पृ.१०३), रेकॉर्ड प्लेअर, स्विच, लेस (पृ. १०६), टाईप (पृ. ११०).

८ ) **पावसाळयातली गोष्ट :-**

टॉवेल, युनिव्हर्सिटी (पृ. ११६), चेक, मार्केट (पृ. ११७), प्रॉब्लेम्स, कॉलेज, लेक्चर्स, प्रोग्रॅम, टेबल लँम्प (पृ. ११९), रेनकोट, सायकल, प्लीज (पृ. १२०), टॉर्च, फर्निचर, शेल्फ, डॉवर, पेन, डायऱ्या, ग्रुप (पृ. १२१), पोस्ट, ग्रॅज्युएशन (पृ. १२२), शट-अप (पृ. १२३), ब्लॉक (पृ. १२४), पेपरवेट, किचन, बेडरुम (पृ. १२५), पँट फ्रेम (पृ. १२५), स्टडी , टेबल, इन्टलेक्च्युअल, कव्हर्स (पृ. १२९), कर्मशियल, बिझिनेस, अकांऊट्स, डेबिट-क्रेडीट, इंटरेस्ट, ॲरेंज (पृ. १३०), रोमँटिक (पृ. १३४), मिस्टर, ग्लास (पृ. १३५), ऑरेंज, बेसिन, कॅलेंडर (पृ. १३६), पॅसेज (पृ. १३७).

**९ ) दुसरं घर :-**

कॉलेज, नोटस् (पृ. १३८), ग्रॅज्युएट (पृ. १४०), ब्लाऊज, सेफ्टी पिन, बास्केट (पृ. १४१), रिंग्ज (पृ. १४२), कॅलेंडर, कव्हर, गेट (पृ. १४७).

**१० ) चाफा :-**

स्टॉप, बेल (पृ. १५२), एमेस्सी (पृ. १५३), ग्रॅज्युएट, इंटरव्ह्यू (पृ. १५४), रूटिन, सिनेमा, प्रोजेक्ट (पृ. १५५), मिस्टर, फॉरेन, सर्व्हिस, फर्स्टक्लास, रीसर्च, युनिव्हर्सिटी (पृ. १५६), ट्रेनिंग सेंटर, थॅंक यू सर, डॉक्टरेट, स्कूटर (पृ. १५७), इंटरव्ह्यू, डिअर (पृ. १५८), सेलिब्रेट (पृ. १६०), फॅडस् (पृ. १६१).

**११ ) दुहेरी :-**

स्टेशन (पृ. १६२), जीप, पोर्च, फर्निचर (पृ. १६३), ड्रिस्ट्रिक्ट, ऑफिस, क्लार्क, (पृ. १६४), बाथरुम (पृ. १६५), इंजिनिअर, रेल्वे, पोस्ट, टेलीफोन्स, साईट (पृ. १७१), ऑफिस वर्क (पृ. १७५), शेड, पोलीस, व्हॅन (पृ. १८०), पोलीस ऑफिसर (पृ. १८१).

**१२ ) खिडक्या :-**

होस्टेल (पृ. १८४), तार (पृ. १८५), कॉपीराईट (पृ. १८६).

**१३ ) संदर्भ :-**

प्यून, लॉ कॉलेज, स्टेशन, फुटपाथ (पृ. १५९), हार्ट ॲटॅक (पृ. १६३), बॉस, डिव्हिजन पर्सोनेल, ट्रेनिंग, सिलेक्शन (पृ. १६४), पॉलिश (पृ. १६५), इन्स्टिटयूट, रिसर्च सेंटर,फ्लॅट, रेकॉर्ड, टेप्स, ऑफिस (पृ. १६६), टिपिकल, करिअर (पृ. १६७), फिलॉसफी, मूड, मॅनेजमेंट कोर्स, कोर्ट, केस (पृ. १६९), वेटर, सीझन (पृ. १७०), ड्रायव्हर्स (पृ. १७१).

**१४ ) स्वाध्याय :-**

गुड इव्हिनिंग (पृ. १९), डेप्युटेशन, इन्स्पेक्शन, डिपार्टमेंट, सर्व्हे, क्लायंट्स, मीटिंग्ज, रेस्टहाऊस, फर्निचर (पृ. २०), बास्केट, हॉल, हेडऑफिस, मिसेस, प्लीज, युनिट्स (पृ. २२), ट्रंककॉल, वॉश, बाथरुम (पृ. २३), लाईन, हॉस्पिटल (पृ. २४),

पर्स, टॉर्च, बसस्टँड, जीप, स्टॉल (पृ. २६), इन्स्पेक्शन, इंटरेस्टींग (पृ. २७), बस, प्रायव्हेट, ड्रायव्हर (पृ. २८), ऑफिस, स्टँड, रिक्षा, हॉस्पिटल, नर्सेस (पृ. २९).

'खिडक्या' या कथासंग्रहात इंग्रजी शब्दांचा वापर करुन कथा आधुनिक रुपात आपल्यापुढे मांडण्यात लेखिका यशस्वी झालेली दिसून येते. या इंग्रजी शब्दांबरोबरच पीछे मूड (पृ. ७४), सालं (पृ. ७५), छोकरा (पृ. १२९) असे हिंदी शब्द देखील वापरले आहेत. पण कथा वाचताना कुठेही क्लिष्टपणा जाणवत नाही. सरळ, साधी, सोपी आपलीच भाषा आहे असे वाटते.

**९ ) 'खिडक्या' कथासंग्रहामधील अभ्यस्त शब्द :-**

सानियांच्या कथासंग्रहातील एकूण १४ कथांची भाषा अतिशय साधी, सरळ, ओघवती आहे. इंग्रजी शब्दांच्या जास्तीजास्त वापरामुळे भाषा अतिशय आधुनिक पद्धतीची वाटते. काही वेळा मध्ये मध्ये हिंदी शब्दाचा ही वापर केलेला दिसून येतो. त्यामुळे भाषा वाचताना कोणत्याही प्रकारचा बोजडपणा दिसून येत नाही. रोजच्या व्यवहारिक जीवनातील भाषा वाटते.

तसेच 'जाणुनबुजून', 'धुणभांडी' (पृ. ९), 'जाणीव-नेणिव' (पृ. ११), 'आवराआवरी' (पृ. १२), 'देवाणघेवाण' (पृ. ४५), 'ऊन्हा-तान्हात' (पृ. ५३), 'लाजणं-बिजणं', 'सावधबिवध' (पृ. ६०), 'घसराबिसरायची' (पृ. ६३), 'काळया-पांढऱ्या' (पृ. ६६), 'खाचखळगे' (पृ. ७२), 'इकडे-तिकडे' (पृ. ७३), 'इमाने-इतबारे' (पृ. ७४), 'ये-जा' (पृ. ७५), 'लहानसहान' (पृ. ७६), 'पुढंमागं' (पृ. ७८), 'मुलं-मुली' (पृ. ८१), 'लग्नबिग्न', 'भेटीगाठी' (पृ. ८४), 'बघता-बघता' (पृ. ८७), 'मागणीबिगणी' (पृ. ९०), 'खसाखसा'(पृ. ९१), 'भेटीबिटी' (पृ. ९२), 'घालमेल' (पृ. ९५), 'खातेपिते', 'शेजारपाजार' (पृ. ९८),'कशीबशी' (पृ. ९९), 'घरदार' (पृ. १००), 'सावरतासावरता' (पृ. १०२), 'जाताजाता' (पृ. १०३), 'जुळवाजुळव' (पृ. १०५), 'देणे-घेणे', 'चार-चौघे'(पृ. १०८), 'वाकडातिकडा' (पृ. ११०), 'चालता-चालता' (पृ. ११०), 'वेडयावाकडया' (पृ. ११९), 'ऊठसट' (पृ. १२०), 'रमतगमत' (पृ. १२१), 'काटयाकुटयात' (पृ. १२४), 'देवाणघेवाण' (पृ. १२५), 'खरंखोट' (पृ. १२७), 'गमती जमती' (पृ. १३१), 'आतून बाहेरुन' (पृ. १३४), 'अदलाबदल' (पृ. १३७), 'कसेबसे',

'अध्यातमध्यात' (पृ. १३९), 'जेमतेम' (पृ. १४४), 'ध्यानीमनी' (पृ. १४५), 'सहजा सहजी' (पृ. १४६), 'चाळवाचाळव' (पृ. १४८), 'सरळसाधी' (पृ. १४९), 'आवराआवरी' (पृ. १५१), 'सुखसोई' (पृ. १६५), 'जवळपास' (पृ. १७०), 'दळणवळण' (पृ. १७१), 'रीतीरिवाज' (पृ. १७२), 'बारीकसारीक' (पृ. १७६), 'वेडावाकडा' (पृ. १८४), 'खिडक्या-दारं' (पृ. १९०), 'लुडबूड' (पृ. १९), 'लगबग' (पृ. २२), 'वादविवाद' (पृ. २३), 'चळाचळा' (पृ. २४), 'उलटे-पालटे' (पृ. २५), 'चढउतार' (पृ. २६), 'योगायोग' (पृ. २८), 'चुकचुक' (पृ. २९), 'आडवं-तिडवं' (पृ. २९), 'शिव्या-शाप' (पृ. १६३), 'ओढून-ताणून' (पृ. १६४), 'मित्रमंडळी' (पृ. १६५), 'पुढेमागे' (पृ. १७०), 'बांधाबांध' (पृ. १७२) .

अशा प्रकारचे शब्द या कथासंग्रहात वापरण्यात आल्यामुळे यातील कथांची गोडी आणखीनच वाढलेली आहे. अभ्यस्त शब्द, क्रियाविशेषण अव्यय, गुणवाचक विशेषणांचा वापर केल्यामुळे कथा खूपच वाचनीय बनली आहे.

लेखिकेची भाषा साधी, सोपी, सरळ, वेधक आहे. त्यात भर पडते ती आकर्षक संवादांची. संवाद देखील खूपच सुंदर आणि लक्षणीय आहेत. ते विषयांमधला साधेपणा, सरळपणा जपतातच पण कथेचे रंजक मूल्यही वाढवतात. हे संवाद देखील मराठी-इंग्रजी मिश्रीत भाषाशैलीत आहेत. त्यामुळे कथा समजायला सोपी जाते. वाक्प्रचारांचा वापर तर कथेत शिगोशीगपणे भरलेला दिसून येतो. त्यामुळे निवेदनात अर्थगर्भता वाढते.

सानियांच्या या मराठी इंग्रजी भाषेमूळे या कथासंग्रहाला दर्जेदारपणा आलेला आहे. तसेच स्त्रीजातीचे दु:ख, तिचे प्रेम, माया, मत्सर, मोह या सगळयांचे चित्रण खास निवेदन शैलीत मांडले आहे. तरीही इंग्रजी भाषेचा जास्तीतजास्त पगडा त्यांच्या भाषा शैलीत दिसून येतो. क्वचित हिंदी भाषेचा वापर त्या करताना दिसतात. जे काही त्यांच्या कथांमधून जाणवते ते व्यावहारिक जीवनाततील सत्यच आहे. जाता जाता कथेमध्ये वाक्प्रचार केवळ कथेला कल्पकता यावी म्हणून पेरणे किंवा कथांतील संवाद बोली भाषेतून लिहणे असे आपण पुष्कळदा पाहतो. पण संपूर्ण कथाच निवेदन पद्धतीने लिहणे, दुसऱ्याला-जवळच्या व्यक्तीलाच कथा सांगत आहोत अशी कथा उतरली आहे. त्यामुळे त्यांची भाषा लवचिक, प्रवाही, वाहत्या पाण्यासारखी वाटते.

## १० ) 'खिडक्या' कथासंग्रहातील प्रतिमांचा वापर :-

सानियांनी म्हणी-वाक्प्रचारांबरोबर प्रतिमांचा, उपमांचा वापर केलेला दिसून येतो. त्याचप्रमाणे भाषा ज्या भूमी आणि संस्कृतीतून जन्म घेते तेथून आलेल्या प्रतिमा या भाषेत सहजपणे येतात. सानिया या स्वत: आधुनिक वातावरणात वाढलेल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या कथेत आलेल्या प्रतिमांना देखील आधुनिकतेचा सुवास येतो. उदा.-

'मग ती अगदी हळवी, मऊसर होऊन गेली.' (पृ. १९), 'एका विशिष्ट उंचीवर मनाचे दरवाजे खुले करुन ती उभी होती आणि आत-बाहेर जागाच जागा होती.' (पृ. १९), 'स्वत:च्या हळूहळू तीव्र होत जाणाऱ्या एकाच वेळी सूख आणि वेदना देणाऱ्या शुद्ध अतीव भावनांच्या आंदोलनात ती हेलकावत राहिली.' (पृ. ३८), 'सर दिसले आणि हातातून सुटलेल्या दोऱ्यांच्या गुंडाळयासारख्या आठवणी पसरत गेल्या.' (पृ. ४०), 'ते तिच्याकडे पहात होते, चेहरा विदीर्ण झाल्याप्रमाणे.' (पृ. ४४), 'सगळे मार्ग दूर दिशांना वळलेले, हरवलेले, एकमेकात गुंतत, धक्के देत दूर झालेले विरुन गेलेले.' (पृ. ५१), 'दुपार एकदम कलल्यासारखी वाटली.' (पृ. ५४), 'पायांनाही शिस्त होती वर्षानुवर्षाची.' (पृ. ७६), 'रस्ता इतका माहितीचा होता की मन इकडे-तिकडे फिरायला तयार होतं.' (पृ. ७९), 'पाय शरीर घेऊन चालतात. अनेक दिवसाच्या, वर्षाच्या शिस्तीनुसार आखलेल्या नियमित रेषांवरुन आणि मन इकडे-तिकडे सरकतं ते सुद्धा ठराविक कक्षेतूनच.' (पृ. ८१), 'शरीराला आणि मनालाही इतकी सवय कशी लागते? त्या सवयीपायी सुटलेल्या क्षणांची हळहळसुद्धा त्या सवयीतच येऊन जात असावी.' (पृ. ८२), 'कसली सावली पडल्यासारखे काहीसे गढूळ वाटत होते.'(पृ.१०३), 'किरण नंदिताच्या पाठीशी तिला आधार दिल्यासारखा उभा राहिला.' (पृ. १०६), 'कारंज्याचे मुलायम फवारे उधळावेत तसे नूरजहानचे तलम स्वर खोलीभर पसरले.' (पृ. १०६), 'किरण तिच्या समोरच गोठून गेल्यासारखा तिच्याकडे पहात होता.' (पृ. १०९), 'कधी कुणाशी एवढया अगत्याने बोलावे असेही कधी वाटले नाही आणि आज बाहेरच्या पावसाची लय साधून सगळे हातातून सांडून जात आहे.' (पृ. १०९), 'सकाळपासून सगळे अव्यवस्थित, आजारी वाटत होते.' (पृ. ११०), 'नकोशा आजारी वाटणाऱ्या दिवसाला असे सामोरे जाता जाता तिला थकायला आले.' (पृ. ११२), 'दिवस अगदी

वाईट आजारी जात होता.' (पृ. ११३) 'संध्याकाळ होत आहे असेही वाटत नव्हते. जड, उदास, काळोख!' (पृ. ११८) 'ही अडचण अशी भागणार नाही. सतत धार लागलेल्या पावसासारखी...' (पृ. ११९), 'वळून तिने उशीत चेहरा खूपसला. उशीचा, गादीचा स्पर्श थंडगार होता.' (पृ. १२०), 'आत विशेषसे फर्निचर नसणे, लोंबणारे कपडे, उघडया दारातून दिसणारी बाहेरची उदासवाणी दृश्ये.' (पृ. १२२), 'त्याच्या आकर्षणातून सुटका होत नाही. खोल विहिरीत डोकवायला भीती वाटते, पण पाय तिकडे वळतात तसे!' (पृ. १२२), 'एक प्रकारचा वैतागच भोवती साचला आहे. कोंडलेल्या पुराच्या लोंढयासारखा.' (पृ. १२६) 'ब्लाऊजच्या बाहया म्हणजे तर पोतं बर!' (पृ. १४१), 'पण शैलाताई म्हणजे एरवीच्या रखरखीत बागेत कोपऱ्यात अवचित उगवलेल्या झेंडूच्या का होईना, फुलझाडाप्रमाणं होत्या.'(पृ. १४२), 'ती बाई आपल्याकडे निरखून पाहते आहे. हे तिच्या लक्षात येत होतं आणि मग त्यात अडकून पडलेल्या कैद्यासारखी ती गप्प बसून राहिली.' (पृ. १४८), 'तो प्रश्न सोबतीला घेऊन उत्तराच्या दिशेनं तिचा एक लांबलचक प्रवास सुरू झाला.'(पृ. १५१), 'वारा आगदी नव्हता आणि सगळेच एकूण चिडचिडल्यासारखे झाले होते.' (पृ. १५२), 'शरीर जडावलेले पण सगळे तेज बाहेर फुटत असल्याप्रमाणे रसरसलेले, सुरेख सोनचाफ्यासारखे.' (पृ. १५३), 'आपली जातच अशी नेभळट, सरळ, मध्यमवर्गीय म्हणता म्हणता पोचट झालेली. आळणी.'(पृ. १५५), 'तेवढयात सोनूची गोरी पावलेच नजरेपुढे आली ती देखील खिजवून हसल्याप्रमाणे.' (पृ. १५६), 'आणि तिचा चाफ्यासारखा देह मग आपणच फुलवला असता...' (पृ. १६१), 'ऊन सगळीकडे सांडल्यासारखे पसरलेले.' (पृ. १६४), 'मग तळयातल्या टेकडीसारखं होऊन जात हे गावं' (पृ. १७१), 'आतवर साठवलेले सगळे दु:ख, वाटले की प्रवाहासारखे बाहेर पडणार.' (पृ. १८१), 'पुष्कळ दिवसांनी सूर्यप्रकाश पहावा तसे सुमाचे डोळे दिपून गेले.' (पृ. १८३), 'आत खुर्ची-टेबलावर वेडावाकडा देह पसरुन तो कोसळलेला होता.' (पृ. १८५) 'एखाद्या सहज शक्तीवान प्रवाहासारखे ते दिवस.' (पृ. १८७), 'तिचा कोवळा चेहरा अकारणच दबून गेल्याप्रमाणे निर्विकार असे.' (पृ. १८९), 'तिथे दिवा चालू होता, पण सगळा अंधार बागेत साचून राहिल्यासारखा.' (पृ. २२), 'इतका काळोखी एकटेपणा नेहमीसाठीच अंगात मुरलेला होता.' (पृ. २६), 'एक प्रकारचा उदास, दबता दिवस

पूर्वेकडून हळूहळू उगवतो आहे. असं वाटायला लागलं.' (पृ. २९), 'त्याचा चेहरा आता उजेड पडल्यासारखा दीप्तिमान दिसू लागला होता.'(पृ. १६६, स्वाध्याय), 'कित्येक गोष्टी संदर्भ बदलले की कळांहीन होतात. त्याची उंची तितकी राहत नाही.', 'संध्याकाळ अंगावरुन उतरुन गेली की असे हलके, रिकामे आणि समजूतदार का वाटते आहे आपल्याला?' (पृ. १७२, संदर्भ).

मानवी स्वभावाचे दर्शन घडणाऱ्या त्यांच्या प्रतिमा आहेत. अशा प्रकारच्या वेगवेगळया प्रतिमांचा वापर त्यांनी सफाईने आपल्या कथेमध्ये दिसून येतो. हे देखील त्यांच्या कथेचे खास वैशिष्टय आपल्याला म्हणता येईल.

**११ ) 'खिडक्या' कथासंग्रहाचे वेगळेपण : -**

सानिया यांच्या कथांची वैशिष्टय किंवा वेगळेपण त्यांच्या कथा वाचता क्षणीच लक्षात येते. आधुनिकतेचा वसा घेतलेल्या सानियांनी इंग्रजी भाषेचा भरपूर वापर केलेला दिसून येतो. तसेच प्रत्येक कथेतील पात्रांच्या तोंडचे संवाद सहज, सुंदर, विलोभनीय वाटतात. वाचकाला आत्मशोधन आणि आत्मपरीक्षण करायला लावणाऱ्या त्यांच्या कथा आहेत.

सानियांच्या घरच्या पुरोगामी वातावरणाचा, शिकवणुकीचा त्यांच्या साहित्यावर परिणाम झालेला दिसून येतो. साहजिकच त्यांच्या कथा, कादंबऱ्यात भेटणारी पात्रे विचार करणारी आहेत. स्वत:च्या शारिरीक, मानसिक आघातापेक्षा मनामध्ये लपून राहिलेल्या भावनिकतेचे दर्शन त्यांच्या कथेतून घडते.

माणसामाणसांमध्ये बंध शोधू पाहणाऱ्या सानियांना सामाजिक गोष्टीवर भाष्य करण्यापेक्षा मानव, मानवीसंबंध, त्यातली नाती यात रस आहे. कारण समाज सतत बदलत असतो. सामाजिक संदर्भ बदलत राहतात. त्याचे परिणाम बदलत असतात. याउलट मानवी संबंध चिरंतन आहेत आणि या चिरंतनतेवर त्यांचा विश्वास आहे.

त्यांच्या 'खिडक्या' या कथासंग्रहात चौदा कथांचा समावेश केला आहे. या सर्वच कथेतून अनुभवाचा वेगळेपणा आपल्याला जाणवत राहतो. या अनुभवात असणारा वेदनेचा सल वाचकांना विचार करायला लावल्यावाचून रहात नाही. हे सानियांच्या कथेचे यश आहे.

## १२ ) मर्यादा :-

'खिडक्या' या कथासंग्रहात लेखिकेच्या लेखनामध्ये काही मर्यादा आढळतात. त्यांच्या कथेतून पात्रांचे, शैलीचे, अनुभवविश्वाचे वेगळेपण जाणवून देखील अनुभवातील नाविन्य व चैतन्य कमी झाले आहे. आता या कथा वाचताना तोचतोचपणा जाणवतो. त्याचप्रमाणे त्यांच्या कथेत असणारी माणसे व त्यांना येणाऱ्या अनुभवाच्या बाह्यआकारात देखील फार मोठी वैविध्यपूर्णता किंवा वैचित्र्य नसते.

काही वेळा अकारणच कथेची लांबी वाढल्याची दिसून येते. नायिका फक्त स्वत:मध्ये किंवा स्वत:च्या जवळच्या माणसामध्ये गुंतलेली दिसून येते. त्यामुळे सामाजिक तपशील फारसे दिसून येत नाही. असे वाटते की नायिका फक्त विचार करुनच जगतात की काय? त्यांना आर्थिक संकटे कधी आलेली दिसूनच येत नाहीत. त्यामुळे कथा काही वेळा एकपदरी वाटते. त्याचप्रमाणे स्वत:शीच तिचा एकसुरी संवाद चालू असतो. त्यामुळे तिला जाणवणारा एकाकीपणाच फक्त आपल्यापुढे येतो. सुखी संसाराचे चित्र क्वचितच आपल्यापुढे येते.

"जे काही पेच उत्पन्न होतात ते स्त्रियांच्या विविध प्रकारच्या नात्यातून किंवा जवळिकीतून पुढे येतात आणि ते सोडवण्यासाठी एकही नायिका संघटनेचा किंवा बाहय कोणताच आधार घेत नाही कारण हे पेच इतके सूक्ष्म व तीव्र असतात की ते अंतापर्यंत तसेच राहतील किंवा आत्मबळ वाढवण्यानेच त्याची तीव्रता कमी करता येईल असे नायिकेला व पर्यायाने लेखिकेला वाटते. त्यामुळे स्त्री अत्याचाराविरोधी किंवा स्त्री मुक्तीवादी असे रुप या लेखनात येत नाही.'' [७]

अशा या लेखनाच्या मर्यादा लेखिकेच्या 'खिडक्या' या कथासंग्रहातून मिळतात.

## समारोप :-

'खिडक्या' हा कथासंग्रह विविधतेने नटलेला आहे. त्यातील स्त्रिया, पुरुष चित्रणे, म्हणी, वाक्प्रचार इंग्रजी शब्द, छोटी छोटी, वाक्ये, याचा वापर केल्यामुळे कथा अधिक कलात्मक झाल्या आहेत. त्यांची साधी, सोपी, सरळ आणि ओघवती भाषाशैली यामुळे कथा खूपच आकर्षक झाल्या आहेत. विशिष्ट प्रसंगनिर्मिती, स्त्रियांना समजून घेणारे, तरीही

परस्परात दुरावा असणारे स्त्रियांचे, पुरुषांचे चित्रण, त्यांचे राहणीमान, त्यांचा व्यवसाय, त्यांचा अंगभूत दुरावा याचे दर्शन या कथासंग्रहातून घडते. प्रत्येक कथेतील आशय एक वेगळा अनुभव सांगून जातो. त्यांचा कथेतील स्त्रिया प्रस्थापित रुढीविरुद्ध बंडखोरी करणाऱ्या आहेत. 'स्त्री' आहे म्हणून तिच्यावर जी काही बंधने असतात त्याला छेद देणाऱ्या सानिया यांच्या कथा आहेत. हेच सानिया यांच्या कथेचे विशेष आहेत. सानियांची कथा वाचकाला विचार करायला भाग पाडते. वाचकाची मती गुंग करुन टाकण्याचे सामर्थ्य सानियांच्या अंगी आहे. त्यामुळे एक विशिष्ट प्रकारचा दर्जा असलेल्या या कथा आहेत. परंपरेने जे स्त्रियांच्या बाबतीत घडत आले आहे त्याला झुगारुन देणाऱ्या सानियांच्या नायिका आहे. आजपर्यंतच्या स्त्री कथालेखिकापैकी सानिया यांची कथा बंडखोर स्वरुपाची, रुढ परंपरेला तडा देणारी वाटते.

## संदर्भ :-


१. 'ललित' (मासिक) : नीला उपाध्ये, 'सानियाला जयवंत दळवी स्मृति-पुरस्कार प्रदान-मानवी नात्यांचा एक मनोहारी गोफ' ,ऑक्टोंबर १९९६, पृ. ५५.

२. 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', अंक २५८, प्रा. रेखा इनामदार-साने, स्त्रीवादी दृष्टीकोनातून सानिया यांची कथा, जुलै/सप्टेंबर १९९१, पृ. ८२.

३. 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', अंक २५८, प्रा. रेखा इनामदार-साने, स्त्रीवादी दृष्टीकोनातून सानिया यांची कथा, जुलै/सप्टेंबर १९९१, पृ. ८५.

४. 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', अंक २५८, प्रा. रेखा इनामदार-साने, स्त्रीवादी दृष्टीकोनातून सानिया यांची कथा, जुलै/सप्टेंबर १९९१, पृ. ८३-८४.

५. 'खिडक्या', सानिया, पहिली आवृत्ती, विमल प्रकाशन, पुणे, १९८९, पृ. १७०,२९.

६. 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', अंक २५८, प्रा. रेखा इनामदार-साने, स्त्रीवादी दृष्टीकोनातून सानिया यांची कथा, जुलै/सप्टेंबर १९९१, पृ. ७९.

७. 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', अंक २५८, प्रा. रेखा इनामदार-साने, स्त्रीवादी दृष्टीकोनातून सानिया यांची कथा, जुलै/सप्टेंबर १९९१, पृ. ७८.